## प्रकरण पहिले

### परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी आणि मराठयांचे स्वातंत्र्य युध्द – छ. राजाराम काळ [इ.स. १६८९ ते १७०० ]

युगपुरुष छ. शिवाजी महाराज यांनी मराठयांच्या राज्याची स्थापना सह्याद्रीच्या कुशीत केली. अनंत अडचणी, अडथळे, धोके, संकटे व प्रतिकूल परिस्थिती या सर्वांस समर्थपणे व आत्मविश्वासाने सामोरे जाऊन त्यांनी ते वाढविले व जोपासले हे सर्वश्रुत आहे.

छ. शिवाजी महाराजानी या सह्याद्रीच्या परिसरात मृतवत जिणे जगत असलेल्या सामान्य माणसाच्या मनात नव चैतन्य निर्माण केले, त्यांची अस्मिता जागी केली, त्यांना स्वातंत्र्याची प्रेरणा दिली. आपला धर्म, राज्य व परंपरा यांच्या रक्षणासाठी या सामान्यांच्यातून असामान्य मुत्सद्दी, शूर, वीर तयार केले. त्यांना पिढीजात राज्य करणारे, राज्यकर्ते, मुत्सद्दी, शूर, वीर यांच्या समोर संघर्षासाठी उभे केले, त्यात यशस्वी केले. त्यांचा आत्मविश्वास वाढविला, त्यांच्यात शिस्त निर्माण केली, त्यांच्यापुढे ध्येय ठेवले. त्या ध्येयाच्या पूर्तीसाठी त्यांच्यात आत्म समर्पणाची भावना निर्माण केली. केवळ यामुळेच शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर लगेच औरंगजेब बादशहा हे राज्य नष्ट करण्यासाठी २५ वर्षे महाराष्ट्रात ठाण मांडून बसला, वणवण भटकला, झगडला, परंतु हे चिमुकले हिंदवी–स्वराज्य त्यास नष्ट करता आले नाही.

छ. संभाजीने आपले राज्य व धर्म यासाठी स्वीकारलेल्या हौतात्म्याने तर या सर्वांवर कळस चढविला. मराठयांच्यात शत्रूविरुध्द लढण्याची जिद्द निर्माण केली. त्यांच्या वधानंतर मराठयांच्या राज्याची राजा नाही, राजधानी नाही, खजिना नाही, एकसंघ फौज नाही अशी केविलवाणी स्थिती झाली. औरंगजेबालाच नव्हे तर मराठयांनाही वाटले की आता आपले राज्य

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

संपले. पण एखादया चमत्काराप्रमाणे मराठे पुन्हा उभे राहिले. मराठयांनी मिळेल त्या साधनाने, असेल तेवढया शक्तीने व युक्तीने औरंगजेबाच्या अफाट, प्रबळ व सर्व साधन सामुग्रीने सुसज्ज अशा फौजेबरोबर संघर्ष सुरु केला. आपल्या भूमीच्या व राज्यांच्या संरक्षणासाठी, स्वातंत्र्यासाठी मराठयांनी युध्द सुरु केले. छ.शिवाजी महाराजांच्या तालमीत तयार झालेली पिढी अजून हयात होती. महाराजांनी घालून दिलेले स्वराज्य व स्वातंत्र्याचे ध्येय त्यांच्या समोर होते. या पिढीचे महाराष्ट्रातील सामान्य माणसांच्या साहाय्याने मोगली साम्राज्या विरुध्द जे युध्द सुरु केले त्यासच मराठयांचे स्वातंत्र्य युध्द असे म्हणतात. ते पुढे जवळजवळ २५ वर्षे चालले. हा जो मोगल व मराठे यांच्यात संघर्ष झाला, या संघर्षाचे सेतु माधवराव पगडी यांनी " महाराष्ट्राचे महाभारत " असे केलेले वर्णन अगदी यथार्थ आहे.

महाराष्ट्राच्या ज्ञात अशा दीड-दोन हजार वर्षांच्या इतिहासामध्ये अत्यंत महत्वाचा, वैभवाचा, निकराचा आणि जीवन मरणाच्या संघर्षाचा असा कोणता कालखंड असेल तर तो मराठयांचे स्वातंत्र्य युध्द हाच होय.[१] म्हणूनच मराठयांचे"स्वातंत्र्य युध्द" हे महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासातील एक सोनेरी पान होय. मराठयांच्या या स्वातंत्र्य युध्दाचे नेतृत्व योध्यानी व मुत्सदयांनी केले. त्यात छ.राजाराम, महाराणी ताराबाई, प्रल्हाद निराजी, खंडोबाल्लाळ, रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण, परशुराम त्र्यंबक, संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांनी आपल्या कर्तृत्वाने मराठयांचे राज्य तारले, राखले व स्वातंत्र्य युध्द यशस्वी केले.

मराठयांच्या या स्वातंत्र्य युध्दात सहभागी होऊन या काळाचा इतिहास घडविणा-या कर्त्या पुरुषात परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी यांचा समावेश होतो. मौजे किन्हई [जि.सातारा] येथील एका सामान्य ब्राह्मण कुटुंबात जन्मलेल्या परशुराम त्र्यंबकाने स्वकर्तत्वाने महतपदास पोहोचून मराठयांच्या इतिहासात मोठी कामगिरी बजावलेली आहे. परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी [इ.स. १६६० ते १७१८] हे मराठयांच्या राज्यातील एक नामांकित मुत्सद्दी व सेनानी होते. त्यांनी छ.राजाराम व ताराबाईच्या नेतृत्वाखाली लढल्या

गेलेल्या मराठयांच्या स्वातंत्र्य युध्दात मर्दुमकी दाखविली, पराक्रम गाजविला. छ. राजारामाने त्यास आपला प्रतिनिधी नेमले. मराठयांच्या स्वातंत्र्य युध्दाच्या काळात सुध्दा त्यांनी मुलकी व प्रशासकीय क्षेत्रात चोख कामगिरी बजावली. शाहूच्या आगमनाबरोबर मराठयांच्यात सुरु झालेल्या यादवीत त्याने ताराबाई-च्या पक्षाचा अखेर पर्यंत पुरस्कार केला. त्यासाठी त्यास शाहूच्या कैदेत काही दिवस राहावे लागले. मात्र पुढे छ. शाहूने परशुराम त्र्यंबकाची सुटका करुन त्यास आपले प्रतिनिधी नेमले. अशाप्रकारे परशुराम त्र्यंबकांच्या कार्य-कर्तृत्वाला अनेक अंगे असल्याचे दिसून येते.

परशुराम त्र्यंबकाचा मराठयांच्या राजकारणात केंव्हा आणि कसा उदय झाला ? त्याने मराठयांच्या स्वातंत्र्य युध्दात छ. राजारामांच्या नेतृत्वा-खाली कोणती कामगिरी बजावली ? याचा प्रस्तुत प्रकरणात उहापोह करण्याचे ठरविले आहे.

परशुराम त्र्यंबक यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेण्यापूर्वी त्यांच्या कुलाचा वृत्तांत आणि त्यांचे पूर्वायुष्य यांचा ओझरता परिचय करुन घेणे उपयुक्त ठरेल. यास्तव सदर बाबींची आवश्यक तेवढी चर्चा खाली सादर करत आहे.

कुल व वंश वृत्तांत :

मूळ पुरुष - यमाजी नागोजी कुलकर्णी, किन्हईकर[२]

↓

कृष्णाजी यमाजी

↓

त्र्यंबक कृष्णाजी

↓

परशुराम त्र्यंबक

कृष्णाजीपंत कुलकर्णी यास मौजे किन्हई, जांब, शेंदुरजणे, भाडळे व हिवरे सम्मत कोरेगाव प्रांत वाई या पाच गावचे कुलकर्णी पद होते.[३] त्यांना

या कुलकर्णीपदामुळे "कुलकर्णी" या आडनावाने ओळखले जाई. परंतु हे सर्व कुटुंब किन्हईस राहत असल्यामुळे त्यांना "किन्हईकर" सुध्दा म्हणत. पुढे परशुराम त्र्यंबक हे मोठया नावलौकिकास पोहोचून त्यांना प्रतिनिधीपद मिळाले. तेथून पुढे त्यांना व त्यांच्या वारसाना प्रतिनिधी व नंतर पंतप्रतिनिधी या नावानेच ओळखण्यात येऊ लागले.

## परशुराम त्र्यंबक जन्म कथा :

परशुराम त्र्यंबकाचा जन्म मार्गशीर्ष वद्य प्रतिपदा शके १५८२ इ.स. १६६० मध्ये किन्हईस त्यांच्या राहत्या घरी झाला.[४] परशुराम त्र्यंबकाच्या जन्माविषयी एक आख्यायिका आहे. ती आख्यायिका पंतप्रतिनिधीच्या बखरीत दिली आहे. तिचा थोडक्यात आशय पुढील प्रमाणे - कृष्णाजीपंत हे श्री मूळपीठवासिनी अंबाबाई कसबे औंध या देवीचे निस्सीम भक्त होते. किन्हई ते औंध हे अंतर १८ मैलांचे आहे. कृष्णाजीपंत या देवीस सतत खेटे घालत. पण पुढे ते अशक्त झाल्यावर त्यांनी श्रीचरणी प्रार्थना केली की, माझा सहवास नेहमी सानिध्य असावा असे करणे श्रीकडे आहे. तेंव्हा त्याच्या स्वप्नात येऊन श्री अंबाबाईने सांगीतले की, " तुझ्या घरास किन्हईस येतो परंतु मागे न पहाता मार्ग चालावा " असे सांगताच जागृत होऊन प्रात:कालापासून चालावयास लागले. किन्हई गावाजवळ डोंगर आहे, त्या डोंगराच्यामध्ये खिंड आहे. तेथे आल्यानंतर त्यांनी देवी आली की नाही हे जाणण्यासाठी पाठीमागे पाहिले. ती जगदंबा तत्क्षणी तेथेच डोंगरात विद्युत लतेप्रमाणे उतरली व त्यांच्या दृष्टीस न पडे. पण त्याच खिंडीतून एक वाणी पाच पंचवीस बैल साखर घेऊन येत होता. त्यास एका स्त्री रुपात दिसली. त्या वाण्यास त्या स्त्रीने विचारले की, या गोण्यात काय भरले आहे ? वाण्याने खोटेच सांगितले की, मिठाच्या गोण्या आहेत. तो वाणी बैल घेऊन किन्हईस आला. गोण्यात पाहतो तो त्यात मीठ होते. त्या वाण्यास खोटे बोलण्याचा पश्चाताप झाला. जेथे कृष्णाजीपंत बसले होते तेथे तो वाणी जाऊन बसला व जगदंबेस शरण गेला.

आपल्या हातून झालेल्या चुकीबद्दल त्याने क्षमा मागितली. देवीने त्याचवेळी त्यास अभय देऊन मिठाची पुन्हा साखर केली. ज्या स्थळी देवीने हा चमत्कार दाखविला तेथेच ती प्रगट झाली. तेथे कृष्णाजी पंतांनी छोटेसे देवालय बांधले. त्यांनी श्रींच्या दर्शनाचा नित्यनियम ठेवला. पुढे त्यांच्या वंशाचा भाग्यकाल झाला, तेंव्हा प्रतिनिधींनी तेथील टेकडीवर छोटेखानी किल्ला बांधून तेथेच देवीची स्थापना केली. त्या किल्ल्यास " साखरगड " असे नाव दिले. तेंव्हा पासून त्या देवीस "साखरगड निवासिनी" असे नाव प्राप्त झाले आहे. ही देवी पंतप्रतिनिधी घराण्याचे कुलदैवत आहे. साखरगड निवासिनीची ही कथा कृष्णाजी पंतांच्या बाबतीत घडली नसून ती त्यांचे पुत्र त्र्यंबकपंत यांचे बाबतच घडली असल्याचे प्रतिपादन अन्य चरित्रकार करतात.[५]

त्र्यंबकपंत हा वडीलाप्रमाणेच परमेश्वरभक्त निपजला. त्याने आपल्या वडीलाप्रमाणे श्री देवीची आराधना मनोभावे चालविली. त्यांना सुध्दा देवीने वेळोवेळी साक्षात्कार दाखवून त्याच्यावर कृपा केली. त्यासंबंधीची पुढील दंतकथा प्रसिध्द आहे. " ऐके दिवसी त्र्यंबकपंत हा औंधास गेला. त्यावेळी घरी त्याची पत्नी प्रसूत होण्याची वेळ आली होती. त्याच्या घरात बाळंतपण करण्यास दुसरे कोणी मनुष्य नसल्यामुळे त्याने आपल्या बहिणीस बोलावले होते. तिला त्वरित येता आले नाही. तेव्हा त्या प्रसंगी त्र्यंबकपंताच्या बहिणीचे रुप घेऊन प्रत्यक्ष श्रीजंगदंबा त्याचे घरी आली. तिने त्र्यंबकपंताच्या बायकोचे बाळंतपण केले आणि बारा दिवस म्हणजे बाळाचे बारश्यापर्यंत ती त्याच्या घरी राहिली. बाळाचे नाव "परशुराम" असे ठेवले. बाराव्या दिवशी त्यांची बहिण आली त्यावेळी श्री जगदंबा गुप्त झाली. नंतर ही गोष्ट समजून आली. प्रत्यक्ष जगदंबेने गुप्तरुपाने येऊन साहय केल्याचे समजताच त्र्यंबकपंतास अत्यंत विस्मयानंद झाला व गडिंवर येऊन तो श्री जगदंबेस शरण गेला. त्याने तिचे फार फार उपकार मानले. अर्थात प्रत्यक्ष श्री जगदंबेच्या साहयाने जे पुत्ररत्न प्रसवले गेले ते खरोखरच अत्यंत तेजस्वी, किर्तिशाली नररत्न निपजले."[६]

बालपण :

परशुराम त्र्यंबकाच्या बालपणाविषयीची माहिती कोठेही उपलब्ध नाही. त्याचे बालपण कोठे व कसे गेले ? त्याचे शिक्षण कितपत व कोठे झाले ? या विषयीची माहिती सांगणारे ऐतिहासिक आधार मिळत नाहीत. तथापि इतिहासात ज्ञात असलेली त्यांची पुढील कारकीर्दीतील हुशारी, मुत्सद्दीपणा, समयसूचकता तसेच त्यांनी स्वत: लिहिलेले मराठी काव्य व त्यात योजलेले संस्कृत प्रचुर शब्द या सर्वांवरून त्यांच्या बालपणा विषयी पुढीलप्रमाणे अनुमान काढता येते. परशुराम त्र्यंबकाचा जन्म इ.स. १६६० मध्ये किन्हई येथे त्यांच्या राहत्या घरी झाला. त्यांच्या घराण्याकडे तीन चार गावचे कुलकर्णीपद होते. त्यामुळे त्या काळच्या ब्राहमण कुटुंबातील चाली, रीती, रूढी-परंपरा व रिवाज इ. चे संस्कार परशुराम त्र्यंबकावर झाले असावेत. त्याची मुंज, त्यानंतर काही वेदपठन, बालबोध लिहिता वाचता येणे तसेच मोडी लिहिता वाचता येणे याचा त्यांच्या शिक्षणात समावेश असावा. कुलकर्णीपदामुळे गावाच्या जमाखर्चाशी संबंध येत असल्यामुळे मुलांना जमाखर्च लिहिण्याचे उत्तम ज्ञान दिले जाई. तसेच अंक आकडेमोड व तोंडी हिशेब इ. मध्ये अशा ब्राहमण कुटुंबातील मुले तरबेज असत. त्यांना त्यांच्या घरीच अशाप्रकारचे शिक्षण त्या काळात दिले जाई किंवा पंतोजीकडून त्याच गावात हे शिक्षण मिळे. ब्राहमणांना अनेक गावातून जोशीपणाचे काम करावे लागत असल्यामुळे त्यांना पंचांग ज्ञान आवश्यक असे. तत्कालीन हिंदू समाजाचे सर्वप्रकारचे धार्मिक विधी ब्राहमणांना करावे लागत. म्हणजे ब्राहमण जातीत जन्मलेल्या मुलास त्याकाळी शिक्षण घेणे अत्यावश्यक असे. वरील सर्व गोष्टींचा विचार केल्यास परशुराम त्र्यंबकाचे वरील सर्व गोष्टी चालवण्यापुरते शिक्षण निश्चितच झाले असावे असे अनुमान काढण्यास हरकत नाही.

परशुराम त्र्यंबक हे पुढे एक शूर सेनानी म्हणून नावारूपास आले. त्या काळी तालीम कुस्ती, व्यायाम, दांडपटा, बोथाटी इ. चे शिक्षण हे गावातील तरूणांना दिले जात असे. कारण त्याचा उपयोग त्यांना नित्याचे

जीवन जगताना होत असे. या सर्वातच परशुराम त्र्यंबक त्यांच्या बालपणी पारंगत झाले असावेत. हे त्याच्या पुढील कर्तृत्वाकडे पाहून म्हणता येते. मनुष्य ज्या परिसरामध्ये राहतो त्याचा व त्याच्या आजूबाजूच्या भौगोलिक पर्यावरणाचा, तसेच भोवताली घडणाऱ्या घटनांचाही परिणाम व संस्कार त्याच्यावर होत असतो.

परशुराम त्र्यंबकाचे जन्मगाव किन्हई हे शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याच्या अगदी केंद्रस्थानी होते. परशुराम त्र्यंबकाच्या बालपणाचा कालखंड म्हणजे शिवछत्रपतींच्या अलौकीक पराक्रमाचा व अद्वितीय कर्तृत्वाचा कालखंड होता. शिवप्रभूंनी स्वराज्यातील लोकांची मने एका उत्तुंग ध्येयवादाने भारली होती. स्वातंत्र्य, स्वदेशभक्ती, स्वराज्य, स्वधर्म संरक्षण याचे बीजरोपण लोकांच्या मनात केले होते. महाराष्ट्रात चाललेल्या या महत्कार्याचा परिणाम व संस्कार बालपणी परशुराम त्र्यंबकावर निश्चित झाला असावा. परशुराम त्र्यंबकावर त्याच्या घराण्याचा पिढीजात संस्कार म्हणजे औंधच्या मूळपीठावरील यमाई देवीची उपासना करणे हा ही झाला होता. पुढे त्यांनी आपल्या सुखादु:खाच्या प्रसंगी कुलस्वामीनी विषयी अनेक काव्यपंक्ती रचल्या आहेत. यावरून बालपणीच कुलस्वामिनीच्या उपासनेचा संस्कार त्यांच्यावर झाला असावा या अनुमानास पुष्टी मिळते.

## परशुराम त्र्यंबकाचा उदय :

परशुराम त्र्यंबकाचे बालपण किन्हईस सातारा प्रांतीच गेले. ते चौदा पंधरा वर्षाचे झाल्यानंतर नोकरीच्या निमित्ताने निळो सोनदेव मुजुमदार यांच्याकडे गेले. निळो सोनदेव मुजुमदार हा शिवाजी महाराजांच्या मर्जीतला अत्यंत विश्वासू, प्रामाणिक व पराक्रमी सरदार होते. त्याने परशुराम त्र्यंबकाची हुशारी व शहाणपण पाहून त्यास आपल्या पदरी कारकुनाची नोकरी दिली. निळो सोनदेवाकडे नोकरी व आश्रय मिळाल्यामुळे त्यांचे व परशुराम त्र्यंबकाचे संबंध घनिष्ट होत गेले. निळोपंताचा मुलगा रामचंद्रपंत व

परशुराम हे समवयस्क होते. त्यामुळे या उभयतांचा स्नेह विशेष जडला. शिवाय रामचंद्रपंत हे शिवछत्रपतींचे पेशवे मोरोपंत पिंगळे यांचे जावई असून त्यांचा सातारा प्रांताशी अधिक संबंध होता. परशुराम त्र्यंबक हे सातारा प्रांताचे माहितगार असल्यामुळे उभयतांचा लोभ जडण्यास जास्त कारण झाले.[८] परशुराम त्र्यंबकांच्या कारकुनीच्या नोकरीच्या संदर्भात दुसरे एक मत असे आहे की, त्यांच्या नोकरीची सुरुवात ही निळो सोनदेवाकडे न होता त्यांचे पुत्र रामचंद्रपंत अमात्य यांच्याकडेच झाली.[९]

वरील संदर्भावरून हे लक्षात येते की, छ. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या वर्षी किंवा त्यानंतरच्या वर्षात परशुराम त्र्यंबक हा रामचंद्रपंत अमात्याकडे नोकरीस राहिला. म्हणजे परशुराम त्र्यंबकाने शिवछत्रपतींची शेवटची पाच-सहा वर्षांची कारकीर्द पाहिली होती. त्यामुळे त्या युगपुरुषाचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष प्रभाव परशुरामपंतावर अगदी तारुण्यात जरूर पडला असावा, पण या काळात परशुराम त्र्यंबक एक सामान्य कारकून असून त्याच्या कार्याची नुकतीच सुरुवात झाली होती.

छ. शिवरायांचा मृत्यू इ.स. १६८० मध्ये झाला. त्यांच्यानंतर मराठ्यांचा छत्रपती कोण व्हावा यासाठी संघर्ष झाला. त्यात शिवरायांच्या अष्टप्रधान मंडळात फूट पडली आणि सर्वच अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले. या पार्श्वभूमीवर छ. संभाजीचे राज्यारोहण झाले. त्यानंतर अल्पावधीत औरंगजेब बादशहाचे दक्षिणेत आगमन झाले. घरातील बेदिली व अतिबलाढ्य अशा शत्रूचे आक्रमण या घटनांमुळे छ. संभाजीचा काळ हा मराठ्यांवरील पहिल्या प्रचंड आघाताचा काळ होता. त्यास त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी कसे तोंड दिले हे सर्वश्रुत आहे. छ. संभाजीच्या कारकीर्दीत अनेक प्रधानांच्या पदात बदल झाले. परंतु रामचंद्रपंत अमात्याच्या कमालीच्या तटस्थ अशा भूमिकेमुळे ते अमात्य म्हणून टिकून राहिले. त्यांच्या पदरी असलेल्या परशुराम त्र्यंबकाच्या छ. संभाजीच्या काळातील कार्याचे उल्लेख आढळत नाहीत. याकाळात परशुराम त्र्यंबक हे रामचंद्रपंत अमात्यांच्याकडे विशाळगडी राहून कारकुनी शिवाय

मजमु व मुतालिकीची ही कामे पाहत असत. त्याच कामात त्याची दहा वर्षे गेली. पण या प्रौढावस्थेत त्याने खूप काही पाहिले व अनुभवले.[१०] परशुराम त्र्यंबकाचे लग्न कधी झाले यासंबंधी निश्चित माहिती मिळत नाही. परंतु विशाळगड प्रांतात असतानाच त्यांना कृष्णाजी, श्रीपतराव, जगजीवनराव ही अपत्ये झाली असावीत असे दिसते.

परशुराम त्र्यंबकाची कामगिरी [इ.स. १६८९ ते १६९४] :

इ.स. १६८९ हे वर्ष मराठयांच्या इतिहासातील अत्यंत दुर्दैवी वर्ष होय. या वर्षी छ. संभाजीला पकडून औरंगजेबाने त्यांचा क्रूरपणे वध केला. रायगड ही मराठयांची राजधानी मोगलानी जिंकून घेतली. येसूबाई व शाहू कैद झाले. राजारामास दूर जिंजीला आश्रय घ्यावा लागला. अशा एका पेक्षा एक भयंकर व दुर्दैवी घटना या साली घडून आल्या.

११ मार्च १६८९ रोजी छ. संभाजीचा अत्यंत क्रूर वध करण्यात आला. या भयंकर घटनेने मराठे दिग्मूढ झाले. मराठयांच्या या गोंधळलेल्या मन:स्थितीचा व परिस्थितीचा मोगलांनी पुरेपूर फायदा करून घेतला. १६८९ च्या अखेरीपर्यंत मोगलांनी मराठयांच्या स्वराज्याचा कोकण व देशावरील बहुतेक सर्व भाग व किल्ले जिंकून घेतले. त्यांनी सर्व स्वराज्य व्यापून टाकले. मराठयांच्या ताब्यात रत्नागिरी जिल्हयातील अगदी थोडा प्रदेश आणि घाटावरील सातारा, परळी, वसंतगड, विशाळगड हे किल्ले होते.[११]

इ.स. १६८९ च्या अखेरीस मराठयांचे संपूर्ण राज्य आपण घेवू शकू अशी औरंगजेबास खात्री वाटत होती. शाहू व येसूबाई त्यांच्या कैदेत होते. राजाराम जिंजीकडे गेला होता. मराठयांची राजधानी रायगड त्याच्या ताब्यात आली होती. अशा या परिस्थितीत मराठयांचा प्रतिकार हा किरकोळ स्वरूपाचा राहिल आणि तो ही अल्पावधीतच नाहीसा करता येईल अशी औरंगजेबाची अपेक्षा होती. पण एका वर्षाच्या आतच हा सर्व देखावा झपाटयाने बदलला. राजाराम सुरक्षितपणे जिंजीस पोहचला. त्याने तेथे नवीन

राजधानी स्थापून राज्याची व्यवस्था लावली. संताजी बहिर्जी आणि मालोजी घोरपडे व विठोजी चव्हाण यांनी खुद्द बादशाही छावणीवर छापा घातला. त्यांच्या तंबूचे सोनेरी कळस कापून आणून मराठे अजून जिवंत आहेत हे दाखवून दिले. तसेच रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण, धनाजी जाधव यांनीही कोकण व मावळातील बादशहाने घेतलेले किल्ले एका पाठोपाठ एक असे परत घेण्यास सुरूवात केली. यामुळे मराठयांची पहिली उदास वृत्ती साफ नाहीसी होऊन त्यांना नवा हुरुप चढला. जसजसे विजय मिळत गेले तसतसे त्यांचा आत्मविश्वास वाढत गेला. या पहिल्या उपक्रमाचे प्रमुख श्रेय रामचंद्रपंत, शंकराजी नारायण, धनाजी व संताजी या चौघासच दिले पाहिजे. त्यात पांचवा परशुराम त्र्यंबकही पुढे लवकरच सामील झाला.[१२] हे पाच आणखी कित्येक प्रमुख मराठे मुत्सद्दी व सरदार या कार्यात सहभागी झाले. या काळात त्यांनी जे काम केले, धडाडी व धैर्य दाखवले आणि जो प्रचंड उद्योग पार पाडला त्याचे मराठयांच्या इतिहासातील महत्व अनन्यसाधारण आहे. मराठयांनी स्वराज्यात ठाण मांडून बसलेल्या मोगलांना हाकलून लावण्यासाठी पुढील योजना आखाल्या. [१] मोगलाच्या ठाण्यावर हल्ले करून ती ठाणी उधळून लावणे. [२] मोगलांनी घेतलेले किल्ले परत जिंकून घेणे. [३] मोगलांनी किल्ल्यास वेढे घातले असल्यास ते वेढे उठविण्यास त्यांना भाग पाडणे. [४] मोगल सैन्याची रसद बंद करणे आणि त्यांच्या वाटा बंद करणे.[१३]

छ. राजाराम जिंजीकडे गेल्यापासून रामचंद्रपंत अमात्य हेच "हुकुमतपन्हा" या नात्याने महाराष्ट्रातील मराठी राज्याचे सर्वाधिकारी बनले होते. साहजिकच त्याचा मुतालिक परशुराम त्र्यंबक यांच्या अंगी असामान्य धैर्य, धाडस, शौर्य व मुत्सद्दिगिरी या गुणांमुळे रामचंद्रपंतानी त्यास सरदारकीची कामे देण्यास केली. ते परशुराम त्र्यंबकास निवडक सैनानिशी मोगलांवर स्वारीस पाठवीत.[१४] त्याप्रमाणे परशुरामपंत मोगलांवर तुटून पडून त्यांची दाणादाण करीत. या काळात रायगड व पन्हाळा ही मराठयांची प्रमुख ठाणी मोगलाकडे गेल्यामुळे व स्वराज्यात सगळीकडे शत्रू पसरल्यामुळे मराठयांच्या हालचालीचे प्रमुख केंद्र

विशाळगड हेच होते. मराठयांच्या या प्रमुख ठाण्यास शह देण्यासाठी औरंगजेबाने पन्हाळा येथे मोगलांचे प्रमुख ठाणे निर्माण केले होते. पन्हाळा शत्रूच्या ताब्यात असल्यामुळे मराठयांना महाराष्ट्र व कर्नाटक प्रांतात व विशेषकरून कोल्हापूर प्रांतात हालचाली करण्यास मोठाच पायबंध बसला होता. थोडक्यात विशाळगडी मराठयांची कोंडी झाल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. मराठयांची ही कोंडी फोडून काढणे व पन्हाळया-सारखा महत्वाचा किल्ला व शत्रूचे ठाणे हस्तगत करून मोगलांना दूर हुसकून लावण्याचा विचार रामचंद्रपंत अमात्य व त्याच्या सहका-यानी केला. पन्हाळा घेतल्याने मोगलांच्या दक्षिण महाराष्ट्रातील चढाईस सुध्दा खीळ बसणार होती.

पन्हाळयाची मोहिम [इ.स. १६९२] :

पन्हाळा जिंकून घेण्याचा विचार रामचंद्रपंत व त्यांच्या सहका-यांनी पक्का केल्यानंतर पन्हाळयाच्या मोहिमेची सर्व सूत्रे त्यांनी परशुराम त्र्यंबक यांच्याकडे दिली. हीच परशुराम त्र्यंबकावर पडलेली पहिली मोठी लष्करी जबाबदारी होती. परशुराम त्र्यंबकाने सर्व जय्यत तयारी करून एका रात्री पन्हाळयावर अचानक हल्ला केला व ऑगष्ट १६९२ मध्ये पन्हाळा किल्ला ताब्यात घेतला.[१५] पन्हाळा जिंकून घेणे ही गोष्ट परशुराम त्र्यंबकाच्या कारकीर्दीतील प्रारंभीची उच्चकोटीची कामगिरी होय. या कामगीरीमुळे त्याची मराठयांच्या बलाढय सेनानीत गणना होऊ लागली. मराठयांनी पन्हाळा घेणे म्हणजे बादशाही इभ्रतीला मोठा धक्का होता, हे खाफीखानाच्या पुढील उदाहरणावरून स्पष्ट होते. तो म्हणतो, " पन्हाळयाचा किल्ला हा गगनचुंबी अशा किल्ल्यापैकी एक असून तो विजापूर प्रांताच्या हद्दीत आहे. बादशाहाच्या शूर सैनिकांनी अतिशय श्रम साहस करून तो किल्ला जिंकला होता. तो अल्प प्रयत्नाने राजारामाच्या सरदारांच्या [परशुराम त्र्यंबक व त्याचे सहकारी] हाती पडला."[१६] खाफीखान पुढे सांगतो की, " ही बातमी ऐकून बादशाहा अत्यंत कष्टी झाला. बादशाहाच्या प्रसन्न मनावर दु:खाची धूळ पसरली. तो काहीकाळ अत्यंत चिंताक्रांत झाला. त्याने बहरामंदखानास

म्हटले, " पन्हाळा गेला नाही, विजापूरच जणू गेले. आता ताबडतोब ही हानी कशी दूर करता येईल याची तजबीज करा." [१७] या बादशहाच्या उद्गारावरुन त्याकाळी पन्हाळयास किती महत्व होते हे स्पष्ट होते.

अशा पध्दतीने अचानक हल्ला चढवून पन्हाळा किल्ला जिंकून घेणे हा खारोखारच मराठयांच्या उच्च प्रतिच्या लष्करी कौशल्याचाच एक भाग होता. तथापी परशुराम त्र्यंबकाने मराठयांच्या दृष्टीने हे महत्वपूर्ण यश कसे मिळविले याची तपशिलवार माहिती सांगणारी पुरेशी ऐतिहासिक साधने उपलब्ध नाहीत. अत्यंत बिकट किल्ल्यावर एका रात्रीत धाडसी हल्ला करुन तो जिंकून घेणे म्हणजे मराठयांच्या गनिमी काव्याच्या प्रगत युध्दतंत्राचा तो उत्कृष्ट अविष्कारच होय असे म्हणावे वाटते. परशुराम त्र्यंबकाने नाटयपूर्णतेने पन्हाळा किल्ला एका रात्रीत घेऊन शत्रूस मराठयांच्या युध्दचातुर्याची एक सामर्थ्याची चुणुक दाखाविली. मराठयांच्या ताब्यात असलेला एक एक किल्ला परत जिंकून घेण्यास बादशहाच्या फौजेस किती तरी महिने लागत असत. [१८]

हातून गेलेला पन्हाळा पुन्हा जिंकून घेण्याचे मोगलांनी आटोकाट प्रयत्न केले. इ.स. १६९३ मध्ये औरंगजेबाचा नातू व मुअज्जमचा मुलगा मुईजुद्दीन याने, इ.स. १६९५ मध्ये बादशहाचा दुसरा नातू व अज्जमचा मुलगा बेदारबखत याने, तसेच इ.स. १६९६ मध्ये मोगल सरदार गाजीउद्दीन फिरोजजंग याने, इ. मोगली सरदारानी पन्हाळयास वेढे घालून तो घेण्याचे खूप प्रयत्न केले. पण त्यात त्यांना यश आले नाही. शेवटी औरंगजेबाने स्वत: येऊन २८ मे १७०१ रोजी पन्हाळा घेतला. [१९] औरंगजेबाच्या मृत्युनंतर इ.स. १७०७ मध्ये मराठयांनी पन्हाळा पुन्हा जिंकून घेतला.

इ.स. १६९२ मध्ये परशुराम त्र्यंबकास पन्हाळा जिंकून घेण्याच्या कामी विठोजी केसरकर, काशी रंगनाथ वोर्पे, पवार व भोसले या मराठा सरदारांनी मदत केली, पराक्रम गाजविला, याचे उल्लेख मिळतात. [२०]

परशुराम त्र्यंबकाच्या पन्हाळयाच्या या महत्वपूर्ण विजयानंतर रामचंद्रपंतानी त्याच्यावर अनेक जबाबदारीच्या मोहिमा सोपविण्यास सुरुवात

केली. वर वर्णन केलेली पन्हाळया विषयीची जी झोंबाझोंबी झाली तिचे पूर्ण तपशिल उपलब्ध नाहीत. केवळ मुसलमानी लेखकांचे एकतर्फी अल्प उल्लेखाच उपलब्ध आहेत. व त्या माहितीवरच मराठयांचा हा इतिहास समजावून घ्यावा लागतो. शाहजादा मुईजुद्दीन याने इ.स. १६९३ मध्ये पन्हाळयास वेढा दिला होता त्यावेळचे त्याने बादशहास लिहलेले एक पत्र आहे, त्या पत्रावरुन मोगल-मराठा यांच्यात चाललेल्या चिवट झुंजीवर प्रकाश पडतो. हे पत्र विस्तृत आहे त्यातील महत्वाचा भाग सारांश रुपाने पुढील प्रमाणे -

"........ विनंती की पन्हाळागड जिंकून घेण्याच्या कामावर आपण माझी नेमणूक केली. त्याप्रमाणे मी वेढयाचे काम चालवीत आहे. अलीकडे किल्ल्यातील लोकांपाशी धान्य आणि इतर सामुग्रीचा साठा कमी होऊन ते मेटाकुटीस आले आहेत. त्यांनी पुन्हा आमच्याकडे निरोप पाठवून आपल्या अपराधांची क्षमा मागितली. त्यांनी आपल्याला जीवदान मिळून किल्ल्याच्या बाहेर जाऊ देण्यात यावे म्हणून विनंती केली. आपली मर्जी नव्हती म्हणून त्यांच्या मागण्या मान्य केल्या नाहीत........ या सुमारास रामचंद्र [रामचंद्रपंत अमात्य] आणि परशुराम [परशुराम त्र्यंबक] हे चालून आले. त्यांच्याबरोबर ऐंशी हजार स्वार आणि असंख्य पायदळ असे सैन्य होते. किल्ल्यात रसद पोहोचवावी आणि आतील लोकांना मदत करावी हा त्यांचा हेतू होता. त्यांच्याबरोबर तोफा, रेहकले, बाण, जंबूरक, जेजले आणि इतर शस्त्रास्त्रे होती. ते मोठया धाडसाने या दिशेने चालून आले. काही जण नावातून नदी ओलांडून आले. युध्दाच्या हेतूनेच हे सैन्य चालून आले होते. ही बातमी ऐकताच मी आपल्या सैन्याची रचना केली................ प्रथम उभय सैन्यातून बाण आणि बंदुकी यांचा मारा झाला. हळूहळू युध्द विकराला येऊ लागले. मोठमोठया तोफा चालू झाल्या. आमच्या सैन्याने मोठे शौर्य गाजविले. परशुराम हा शत्रु सैन्याचा पुढारी होता. तो रामचंद्र यांच्या बरोबरीचा होता. योगायोगाने एक गोळी त्याच्या डोक्यात लागली. तो नरकाला गेला. शत्रूचा धीर खचला हे पाहून आमचे स्वार पुढे चाल करुन गेले............. शेवटी शत्रूला टिकाव धरणे अशक्य

होऊन त्याने पळ काढला. मार्गात नदी होती. अनेकांनी नदीत उडया घेतल्या त्यात बरेचजण बुडून गेले. शत्रूच्या पायदळ सैन्यापैकी अगणित माणसे ठार झाली. प्रेतांचे ढीग लागले. परमेश्वर कृपेने आणि बादशहाच्या भाग्याने आम्हाला मोठाच विजय मिळाला.......... आपले कृपाछत्रच आमच्यावर सदैव राहो.[२१]"

मुईजुद्दीनच्या वरील पत्रात परशुराम त्र्यंबकाचा गोळी लागून मृत्यू झाल्याचा केलेला उल्लेख धादांत खोटा आहे, चुकीचा आहे.

पन्हाळा जिंकून घेतल्याची बातमी रामचंद्रपंताने त्याच्या नेहमीच्या पध्दतीप्रमाणे सविस्तर लिहून जिंजीस छ. राजारामास कळविली. छत्रपतीने परशुराम त्र्यंबकास "समशेर बहाद्दूर" असा किताब देऊन विठोजी केसरकर व काशी रंगनाथ वोर्पे यांना इनाम देऊन उत्तेजनार्थ पत्रे पाठविली. विठोजी केसरकर यास बारा गांव इनाम तर्फ मलकापूर प्रांत विशाळगड देण्यात आले. त्यांची परशुराम त्र्यंबकाकडे नेमणूक करून दिली. तसेच काशी रंगनाथ वोर्पे यास मौजे सेबवणे ता. मलकापूर हा गाव इनाम दिला.[२२] छ. राजाराम महाराजांनी विठोजी केसरकर व काशी रंगनाथ वोर्पे यांना लिहलेली दोन्ही पत्रे उपलब्ध आहेत.[२३] पन्हाळा गडाच्या या चार पाच वर्षाच्या संघर्षाविषयी मराठयांच्या बाजूची मराठीतून उपलब्ध असलेली छ. राजारामाची फक्त दोन पत्रे आहेत. यावरून मराठी साधनांची मर्यादा स्पष्ट होते.

### स्वराज्याच्या संरक्षणाची व्यवस्था :

छ. राजारामाने महाराष्ट्रातील राज्याच्या कारभाराची जबाबदारी रामचंद्रपंत, शंकराजी नारायण, संताजी व धनाजी यांच्यावर सोपविली होती. संताजीस रामचंद्र पंताकडे व धनाजीस शंकराजीकडे दिले होते. घाटावर सातारा व कोकणात रायगड या सीमा कल्पून स्वराज्याचे दोन प्रमुख भाग केले. उत्तरेकडील भाग शंकराजी नारायणाकडे व दक्षिणेकडील भाग रामचंद्रपंताकडे देण्यात आला होता.[२४] रामचंद्रपंत आमात्याकडे असलेले परशुराम त्र्यंबक

हे दिवसें दिवस कर्तबगारी, पराक्रम व मुत्सद्देगिरी या गुणांमुळे पुढे येऊ लागले. रामचंद्रपंतानी त्यांना नेमून दिलेल्या प्रदेशातील म्हणजे रायगड व साताराच्या दक्षिणेच्या स्वराज्याच्या प्रदेशातील अनेक मोहिमांची जबाबदारी परशुराम त्र्यंबकावर टाकली. यामुळे सातारा ते कोल्हापूर पर्यंतचा घाटावरील प्रदेश व रायगड ते मालवण हा कोकणातील प्रदेश या क्षेत्रात परशुराम त्र्यंबकाचे पराक्रम गाजू लागले. विशेषत: स्वराज्याचा मूळचा डोंगरी प्रदेश मोगलाकडून सोडवून घेणे, तसेच या डोंगरी प्रदेशातील किल्ले शत्रूकडून हस्तगत करुन घेणे या कामात परशुरामपंताने कसूर केल्याचे दिसत नाही. या काळात हळूहळू मराठयांचा जोर वाढू लागला होता. स्वराज्यातील बराच प्रदेश व काही किल्ले त्यांनी जिंकून घेतले होते. मराठी सुध्दा आता स्वराज्यात सगळीकडे पसरुन ठायीठायी मोगलाना अडवून संघर्ष करत होते. त्यांना हुसकावून देण्याचा प्रयत्न करीत होते. हे लुत्फुल्लाखानाच्या इ.स. १६९२-९३ मध्ये लिहलेल्या एका पत्रावरुन स्पष्ट होते. तसेच या पत्रावरुन बादशाहाच्या बडयाबडया सरदारांनी मराठयांची धास्ती घ्यावयास कशी सुरुवात केली होती हे ही स्पष्ट होते.

लत्त्फुल्लाखान हा बक्षी सहुल्लाखानास लिहलेल्या पत्रात म्हणतो, " तुमच्या उत्कृष्ट कामगिरीच्या बातम्या आल्या. त्यामुळे तुमची स्तुती होत आहे. सरकारी खजिना तातडीने पोहोचविण्याचे काम माझ्याकडे देण्यात आले आहे. मार्गात दुष्ट पाळेगार [मराठे] टोळ आणि मुंग्या याप्रमाणे पसरले आहेत. ते धामधूम करण्यास सज्ज आहेत ही गोष्ट लपलेली नाही. परमेश्वरावर भरंवसा ठेवून मी या कामावर निश्चत आहे." [२५]

स्वराज्यात मोगल-मराठा यांच्यात सतत संघर्ष लढाया व झटापटी होत होत्या. परशुराम त्र्यंबकाच्या अशाच एका झटापटीची माहिती मिळते. परशुराम त्र्यंबक हा आपल्या फौजेसह स्वराज्यात अम्मल बसवत होता. कसबे कलेढोण व मायणी या परिसरात त्याची मोगली फौजेशी भेट झाली. तेथेच इ.स. १६९४ च्या सुमारास मोगली फौजा व परशुराम त्र्यंबक यांच्यात संघर्ष

होऊन परशुराम त्र्यंबकाचा मोड झाला. परशुराम त्र्यंबकाने माघार घेऊन ते तुंग येथे येऊन राहिले. तेथे त्याने आपल्या सैन्याची जमवाजमव सुरु केली होती. मोगलावर पुन्हा चाल करुन जाण्याचा विचार होता पण उधळले गेलेल्या सैन्याची जमवाजमव लवकर होत नव्हती. पुढे काय करावे हे समजत नव्हते. अशा संकटकाळी त्यांना थोरपुरुषाच्या दर्शनाचा लाभ झाला. त्यांच्या आशीर्वादाने प्रोत्साहन मिळून ते मोगलावर चढाई करण्यास पुन्हा सिध्द झाले. परशुराम त्र्यंबकाना ज्या सत्पुरुषाच्या दर्शनाचा लाभ झाला ते म्हणजे श्री आनंदमूर्ती ब्रहमनाळकर हे होत. त्यांचे गुरु "रघुनाथ स्वामी" म्हणून थोर सिध्द पुरुष होते.[२७] या संदर्भातील आख्यायिका थोडक्यात पुढीलप्रमाणे -

परशुराम त्र्यंबकाच्या लष्करातील बाबाजी व शिदोजी डफळे म्हणून दोन शिलेदार होते. श्री रघुनाथ स्वामी हे त्यांचे गुरु असल्यामुळे ते उभयता स्वामीच्या समाधीच्या दर्शनास ब्रहमनाळास गेले होते. तेथून परत येण्यास त्यांना उशीर झाला. परशुरामपंतानी उशिराचे कारण विचारता त्यांनी श्री रघुनाथ स्वामीच्या समाधीच्या दर्शनास गेलो होतो असे सांगितले. प्रार्थनेच्या वेळी स्वामीचे वृंदावन डोलते याचीही त्यांनी पंतास माहिती दिली. दुस-या दिवशी परशुरामपंत यांने डफळयांच्या समवेत ब्रहमनाळास जाऊन वृदांवनापुढे किर्तन केले. वृंदावन डोललेले त्यांनी पाहिले. त्यांना साक्षात्कार झाला व त्यांची तेथे निष्ठा जडली. रघुनाथ स्वामींचे शिष्य श्री. आनंदमूर्ती ब्रहमनाळकर यांची त्यांनी भेट घेतली. त्यांनी परशुरामपंतास कृपाप्रसाद व आशीर्वाद दिला. या घटनेने त्यास प्रोत्साहन मिळून त्यांने भिलवडी येथे असणा-या मोगली सरदाराचा पराभव केला. परशुरामपंताचे गुरु आनंदमूर्तीच्या आशीर्वादाने पंताचा इष्ट हेतू सिध्दीस गेला म्हणून त्याने वृंदावनाच्या पूजाअर्चेसाठी बारा गांव इनाम देण्याचे ठरवले. पण ते त्याच्या गुरुने स्वीकारले नाहीत. परशुरामपंताच्या आग्रहावरुन फक्त ब्रहमनाळ हा एक गाव इनाम स्विकारला. ब्रहमनाळ गाव दिल्याची सनद राज्याभिषेक शके-२१

भावसंवत्सर जेष्ठ वद्य-७ सोमवार शके १६९६ इ.स. १६९४ रोजी दिली अशी नोंद आहे. " राजाराम महाराज चंदीहून सुरक्षित येतील महाराष्ट्र राज्य पुन्हा होईल " म्हणून आनंदमूर्तीची परशुराम त्र्यंबकास अभिवचन दिले.[२८]

कसबे कलेढोण मायणी परिसरात परशुराम त्र्यंबकाचा मोगली सरदाराकडून इ.स. १६९४ च्या सुमारास पराभव झाला. तरी त्याने खचून न जाता पुन्हा फौज जमवून मोगली सरदाराचा पराभव केला. याच काळात रामचंद्रपंत, शंकराजी नारायण, संताजी घोरपडे, धनाजी जाधव या सरदारांना सुध्दा कधी जय तर कधी पराजय यांना तोंड द्यावे लागत होते. असे असले तरी वरील प्रमुख अशा या पांच मराठा सरदार व मुत्सद्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करून इ.स. १६८९ मधील मराठयांची केविलवाणी स्थिती अल्पावधीतच बदलून टाकली. त्यांनी पराभवाने खचून न जाता, चिकाटीने व चिवटपणे मोगलांशी झुंज दिली. त्यांची शक्ती कमी असल्यामुळे त्यांनी गनिमी काव्याच्या युध्द-तंत्राचा सर्रास वापर केला. त्याशिवाय ते मोगला विरूध्द टिकूच शकत नव्हते.

संताजी-धनाजी दिलजमाई :

जिंजीपासून नाशिक पर्यंत मोगल-मराठा संघर्ष चालला होता. स्वराज्यात परशुराम त्र्यंबक व शंकराजी नारायण हे होते. तर स्वराज्याच्या बाहेर संताजी घोरपडे, धनाजी जाधव, बहिर्जी व राणोजी घोरपडे, हणमंतराव निंबाळकर, नेमाजी शिंदे इ.प्रमुख मराठा सरदार मोगलांवर हल्ले चढवत होते.

स्वराज्यातील जी वतनदार मंडळी इ.स. १६८९ मध्ये हे राज्य नष्ट होत आहे असे समजून मोगलांना मिळालेली होती. ती मंडळी मराठयांच्या स्वराज्याचा कामात सामील होऊ लागली. छ.राजारामाच्या वतने देण्याच्या धोरणाचा परिणाम होऊन अमृतराव निंबाळकर, नागोजी माने इ. मराठा सरदार स्वराज्यात आले. त्यांची वतने ही छत्रपतीने कायम केली. यामुळे सुरुवातीपासून

स्वराज्याशी एकनिष्ठ राहून काम करणारांना सहाजीकच नवीन आलेल्यांच्या विषयी चिड होती, तिरस्कार वाटत होता. शिवाय यातच छ. राजाराम त्यांना जवळ करीत असे. अशा या कारणावरूनच इ.स. १६९३ च्या अखेरीस संताजी घोरपडे व खुद्द छ. राजाराम यांच्यात मतभेद निर्माण झाले. संताजी रागाने महाराष्ट्रात निघून आला.[२९] महाराष्ट्रात आल्यानंतरही संताजीचा रामचंद्रपंत अमात्य यांचेबरोबर रूसवा झाल्याचे त्यांच्या रामचंद्रपंतास लिहिलेल्या एका पत्रावरून समजते.[30]

संताजी घोरपडे सारखो शूर व धाडशी पुरूष पाहिजे ते कृत्य अंगावर घेण्यास समर्थ असताना कोणाशीही न पटणा-या स्वभावामुळे त्याचे रूसवे फुगवे वारंवार होत. स्वत: छत्रपती व रामचंद्रपंतास अशा बिकट प्रसंगात निरनिराळ्या सरदारांची मनधरणी करता करता पुरेवाट होई. पुष्कळदां संताजी मोगलास सामील झाला आहे असा बोभाटा पंताच्या किंवा राजारामाच्या कानांवर येऊन ते गोंधळून जात.[३१]

संताजी रागाने महाराष्ट्रात निघून आल्यामुळे छ. राजाराम व संताजी तसेच संताजी व धनाजी यांच्यात निर्माण झालेला तणाव सर्वांनाच अस्वस्थ करणारा होता. संताजी घोरपडेसारखा सेनानी दिर्घकाळ रूसण्यात राहणे हे छत्रपतीच्या आणि स्वराज्याच्या हिताच्या दृष्टीने योग्य नव्हते. म्हणून छ. राजारामाने आपला खास दूत विठ्ठल नीळकंठ यास संताजीची समजूत काढण्यासाठी तसेच संताजी व धनाजी यांच्यातील मतभेद मिटविण्यासाठी महाराष्ट्रात पाठवून दिले. विठ्ठल निळकंठ याने ही कामगिरी कशी पार पाडली याविषयी खुद्द छ. राजारामाने चांदजीराव पाटणकर यास १७ एप्रिल १६९४ रोजी पाठविलेल्या पत्रात पुढील माहिती दिली आहे.

" स्वामीने येथून राजश्री विठ्ठल नीळकंठ पाठविले होते. त्यांच्या यांच्या भेटी जाल्या. त्या उपरी राजश्री रामचंद्रपंत रा। परशरामपंतास सातारीयास पाठविले. त्यांनी येऊन उभयता सरदारांची येक्यता करून दिल्ही

आणि वैशाख[एप्रिल १६९४] महा कारणे कर्नाटकात यावे येसा निर्वाह केला आहे. हे वर्तमान उभयतांनी लिहले.[३२]"

अशाप्रकारे सातारच्या मुक्कामी संताजी घोरपडे, धनाजी जाधव, विठ्ठल निळकंठ व परशुराम त्र्यंबक या सर्वांची बैठक झाली. संताजीच्या मनातील सर्व गैरसमजाचे निराकरण करुन परशुराम त्र्यंबकाने त्यांची समजूत घातली. त्यांने उभय सेनानींचे ऐक्य घडवून आणले. त्या उभयतांनी वैशाख महिन्यात कर्नाटकात फौजा घेऊन जाण्याचा निश्चय करुन तशी पत्रे छ. राजारामास जिंजीकडे पाठवून दिली.

शिष्टाईच्या संदर्भातील वरील पत्र एप्रिल १६९४ मधील आहे. यावरुन छ.संभाजी महाराजाच्या वधानंतर पराक्रमाची शर्त करुन स्वराज्याचे संरक्षण करणा-या मराठा सरदारात सुध्दा नंतर मतभेद होऊ लागले होते. परंतु मराठयाच्या सुदैवाने त्यांच्यात तडजोडही घडून येत होत्या हे स्पष्ट होते.

परशुराम त्र्यंबकाने या दोन मातब्बर मराठा सेनानींची दिलजमाई घडवून आणली म्हणजे परशुराम त्र्यंबकाच्या शब्दांना एव्हाना फारमोठी किंमत आली होती हे ही समजते. औरंगजेबासारख्या बलाढय शत्रूला ज्यांनी सळो की पळो करुन सोडले व मोगलांच्या मनात दहशत बसविली. अशा श्रेष्ठ दर्जाच्या मराठी सेनानी व सरदारांच्या दिलजमाईचे नाजूक परंतु महत्वाचे काम रामचंद्रपंतानी सुध्दा मोठया आत्मविश्वासाने परशुराम त्र्यंबकावर सोपविले होते. रामचंद्रपंतानी स्वत:ऐवजी परशुराम त्र्यंबकास या कामासाठी पाठविले होते. याचे कारण संताजी व स्वत: रामचंद्रपंत अमात्य यांच्यात सुध्दा दुरावा व रुसवा निर्माण झाला होता हे ही असू शकेल. काहींही असले तरी वरील प्रसंगावरुन हे स्पष्ट होते की, परशुराम त्र्यंबकाची गणना आता मराठयांच्या प्रमुख मुत्सद्दयात होऊ लागली होती. त्याचप्रमाणे मुत्सद्देगिरी बरोबरच तलवार गाजविण्यात सुध्दा त्यांचे स्थान वरच्या दर्जाच्या सेनानीत गणले जाऊ लागले होते. मराठयांच्या स्वातंत्र्य युध्दात पराक्रम गाजविणा-या पाच प्रमुख मराठा सरदारात परशुराम त्र्यंबकाच्या नावाचा समावेश होत असल्याचे आढळून येते.

कारकीर्दीतील अज्ञात काळ [इ.स. १६९५ ते १६९७] :

इ.स. १६९५ पासून पुढे फेब्रुवारी १६९८ पर्यंतच्या म्हणजे छ. राजारामाचे स्वराज्यात आगमन होईपर्यंतच्या सुमारे तीन वर्षांच्या कालावधीत परशुराम त्र्यंबकाने बजावलेल्या कामगिरीचा वृत्तांत उपलब्ध नाही. त्याच्या या सुमारे तीन वर्षांच्या कर्तृत्वाचा कालखंड इतिहास साधनसामुग्रीच्या न्यूनतेमुळे ज्ञात नाही. परशुराम त्र्यंबकाच्या या काळातील हालचालीवर प्रकाश टाकणारे एखादेही अस्सल कागदपत्र असू नये हे दुर्दैव होय.

वर उल्लेखिलेल्या कालखंडातील औरंगजेब बादशहाच्या हालचालींची व त्याने बदललेल्या छावणीच्या जागांची माहिती लक्षात घेतल्यास या परशुराम त्र्यंबकाच्या कारकीर्दीसंबंधी केवळ तर्काने काही ऐतिहासिक अनुमाने काढणे शक्य होते.

इ.स. १६८९ मध्ये राजाराम महाराज हे स्वराज्यात आपला निभाव लागणार नाही हे लक्षात आल्यावर जिंजीस निघून गेले. तेथे म्हणजे महाराष्ट्रापासून सुमारे सातशे मैल दूर दक्षिणेकडे मराठ्यांची राजधानी स्थापून त्यांनी राज्यकारभार सुरु केला. या घटनेला मराठ्यांच्या इतिहासात अनन्य साधारण महत्व आहे. लष्करी डावपेचाच्या दृष्टीने मराठ्यांचा हा निर्णय अप्रतिम होता. यामुळे मोगलांना दोन आघाड्यावर एक महाराष्ट्रात व दुसरी कर्नाटक, तामिळनाडू या प्रदेशात मराठ्यांशी लढणे भाग पडले. स्वराज्यात मोगलांचा जो प्रचंड दबाव निर्माण झाला होता तो या मराठ्यांच्या कृतीमुळे कमी झाला. औरंगजेबास आपले अनेक नामांकित सरदार कर्नाटकामध्ये पाठवावे लागले. लढाईचे क्षेत्र आता ब-हाणपूर पासून जिंजीपर्यंत वाढले. खुद्द औरंगजेबाने आपली छावणी तुळापूरहून कर्नाटकामधील विजापूर जिल्ह्यातील गलगली येथे हलविली. इस. स. १६९०. हेतू हा की त्यास महाराष्ट्र व कर्नाटक या दोन्ही प्रदेशांवर जातीने लक्ष ठेवता यावे.

औरंगजेब बादशाहा स्वराज्यातून दूर गेल्यामुळे तसेच त्याने अनेक सरदार दक्षिणेकडे गुंतल्यामुळे स्वराज्यात मराठयांना हालचाली करण्यास वाव मिळाला. त्यांनी अल्पावधीत स्वराज्यात पूर्ववत आपला अंमल बसविला. या वार्ता औरंगजेबास गलगली येथे समजत होत्या. परंतु त्याचे लक्ष स्वराज्यापेक्षा दक्षिणेकडील युध्दाकडे जास्त होते. त्याला जिंजी व छ. राजाराम यांना हस्तगत करुन घ्यावयाचे होते. तथापि जिंजी व राजाराम तर हस्तगत होत नाहीतच उलट स्वराज्यात मराठयांचे बळ पुन्हा वाढू लागले आहे हे त्याच्या निदर्शनास आले.

मराठयांच्या स्वराज्यातील वाढत्या वर्चस्वाला पायबंद घालण्यासाठी औरंगजेबाने आपली छावणी गलगलीहून पुन्हा उत्तरेकडे आणण्याचे ठरवून, मे १६९५ मध्ये पंढरपूरच्या पूर्वेस भीमा नदीच्या काठी ब्रहमपुरी येथे आपली छावणी केली. त्या जागेस त्याने इस्लामपुरी नाव दिले. आज त्यास बेगमपूर [ता. मोहळ जि. सोलापूर] असे म्हणतात. या ठिकाणी औरंगजेब बादशहा आक्टोबर १६९९ पर्यंत होता. औरंगजेब महाराष्ट्रात आल्यानंतर दक्षिणाकडे मराठयांचा जोर वाढला. या काळातच कर्नाटकात व तामिळनाडूत संताजी व धनाजी यांनी अप्रतिम विजय संपादन केले. मोगलाबरोबर शेकडो धावत्या लढाया देऊन त्यांना जेरीस आणले.

स्वत: औरंगजेब ब्रहमपुरीहून युध्दाचे नेतृत्व करत होता. यावेळी स्वराज्यातील किल्ले व प्रदेश सांभाळण्याची जबाबदारी ही शंकराजी नारायण व परशुराम त्र्यंबक यांच्यावर पडली असावी हे अगदी स्पष्ट आहे. म्हणजेच इ.स. १६९५ ते १६९७ या काळात परशुराम त्र्यंबकाने स्वराज्यावर विशेषत: रायगड व सातारा यांच्या दक्षिणेच्या प्रदेशात होणा-या मोगली आक्रमनास पायबंध घालण्याचे शिकस्तीचे प्रयत्न केले असावेत हे स्पष्ट होते. कारण रायगड व साताराच्या उत्तरेकडील प्रदेश मुक्त करणे व त्याचे संरक्षण करणे या कामी शंकराजी नारायण गुंतलेले होते. संताजी व धनाजी जिंजी ते ब्र-हाणपूर या विस्तृत प्रदेशावर धुमाकूळ घालीत होते. या सर्वांना योग्य ते मार्गदर्शन करुन त्यांच्यात सुसंवाद व समन्वय साधण्याचे काम रामचंद्रपंत

अमात्य करीत होते. म्हणजे पर्यायाने रायगड व साताराच्या दक्षिणेचा प्रदेश मोगलांच्याकडून सोडवून घेणे, त्याचे संरक्षण करणे, कर्नाटकातील आपल्या फौजेस रसद पुरवणे इ. कामे परशुराम त्र्यंबक या काळात करत असावा असे अनुदान काढण्यास काहीही हरकत नाही. या संदर्भात फक्त पंतप्रतिनिधींच्या बखारीत पुढील उल्लेख आढळतो.

" पनाळा व मिरज वगैरे दरोबस्त किल्ले व काही अमल महाराज चंदीस गेलेवर अमात्यपंत व मोरो त्रिंबक यांचा पुत्र निळोपंत पेशवे करून मुलखाचा बंदोबस्त सांगीतला. त्यास तसा बंदोबस्त न होता निळोपंत मिरजेचे लढाईत ठार झाल्यावरी श्रीमंत महाराज यासी वर्दी लिहून प्रधानपदाचा हुद्दा परशुरामपंत यांसी दिला आणि विशाळगड,पनाळा, रायगड, रांगणा, मिरज वगैरे भुईकोट किले व मुलुख राजश्रीकडे होता तो मोगलांनी घेतला. त्यापाशी लढाई बेशर्त परशरामपंत प्रधान यांणी करून सर्व मुलुखाचा अधिकार करूं लागले." [33] त्याच बखारीत पुढे म्हंटले आहे -

" त्यांणी [परशुरामपंताने] फौज जमा करून भुदरगड, सामानगड, चंदगड, प्रांत हेरे व अजरे वगैरे मुलुख लढाई करून तेथील पाळेगार याची पारपत्ये करून तो मुलूख सर केला आणि भुदरगडावर आपले कुटुंब राहण्यास जागा तयार केली. तेथे वाडा बांधीला ती जागा अद्याप आहे. परशुरामपंत याणी आपला पुत्र कृष्णाजीपंत याशी किले भुदरगड येथे ठेविले. [३४] "

औरंगजेबाने ब्रहमपुरीस छावणी करून दोन-तीन वर्षे झाली तरी स्वराज्यात त्याला म्हणावे तेवढ यश येईना. दक्षिणेकडे ही यश मिळत नव्हते. उत्तरोउत्तर मराठे प्रबळ बनत चालले होते. त्यांनी आता संरक्षक सोडून देऊन आक्रमक पवित्रा धारण केला होता. परिणामत: सर्व आघाडयांवर मोगली सरदार पराभूत होऊ लागले, मार खाऊ लागले. ब-हाणपूर पासून जिंजीपर्यंत मराठयांचा निर्विघ्न संचार सुरु झाला. पण याच वेळी मराठयांचे दुर्दैव ओढवले. जून १६९७ मध्ये आपसातील दुहीमुळे मराठयांचा अप्रतिम मोहरा

व मोगलांचा कर्दनकाळ संताजी घोरपडे यांना खून झाला.

संताजीच्या वधानंतर औरंगजेबाने झुल्फिकारखानास जिंजीचा किल्ला त्वरित जिंकावा म्हणून करडे हुकूम पाठविले. नोव्हेंबर १६९७ मध्ये छ.राजाराम जिंजी किल्ल्यातून निसटला. ७ फेब्रुवारी १६९८ रोजी झुल्फिकारखानाने मराठयांकडून जिंजीचा किल्ला जिंकून घेतला. छ.राजाराम इ.स. १२ फेब्रु. १६९८ रोजी विशाळगडावर सुखरुप येऊन पोहोचले.[३५]

छ.राजाराम स्वराज्यात परत आले, त्यावेळी स्वराज्यातील प्रमुख किल्ल्यांपैकी रायगड, तोरणा, रोहिडा, कोरीगड, लोहगड, राजमाची, प्रतापगड, पन्हाळा, विशाळगड, सातारा, परळी, वसंतगड, चंदन, वंदन, वधनगड, नांदागिरी इ. किल्ले मराठयांच्या ताब्यात होते. म्हणजे छ.संभाजी महाराजाना कैद करण्यापूर्वी जी परिस्थिती स्वराज्यात होती तीच इ.स. १६९८ मध्ये होती.[३६] मराठयांच्या या मर्दुमकीत परशुराम त्र्यंबकाचा नि:संशय अगदी महत्वाचा वाटा होता.

छ.राजारामाच्या उपस्थितीतील कामगिरी [इ.स. १६९८ ते १७००] :

फेब्रुवारी १६९८ मध्ये छ. राजाराम विशाळगडावर परत आला. तेथेच काही दिवस राहिला. छ.राजाराम जिंजीहून परत येताच रामचंद्रपंत अमात्य, परशुराम त्र्यंबक, शंकराजी नारायण यांनी मोगलांच्या ताब्यातून परत जिंकून घेऊन रक्षण केलेले स्वराज्य स्वामी चरणी अर्पण केले. त्यावेळी छ. राजारामास परमानंद होऊन त्याने हया स्वामीनिष्ठ प्रामाणिक व कर्तृत्वशाली सेवकांचा गौरव केला.[३७] स्वराज्यातील आपल्या अधिका-यांनी इ.स. १६८९ ते १६९८ हया काळात केलेल्या लष्करी व मुलकी कारभारामुळे स्वराज्याचा झालेला कायापालट पाहून छ. राजारामास समाधान वाटले.

आजपर्यंत मराठ्यांच्या हालचालीचे केंद्र असणारा विशाळगड हा अगदीच एका बाजूस होता. बादशहाच्या हालचालीवर नजर ठेवण्यास सातारा किल्ला हा सर्वात सोयीचा आहे. असे सर्व सल्लागारांचे मत पडल्यावरून छ. राजारामाने सातारा ही राजधानी करून तेथे आपली गादी व दरबार स्थापन केला.[३८] याच वेळी रामचंद्रपंत अमात्याने आपले "हुकुमतपन्हा" हे पद सोडण्याची इच्छा दर्शवून छ. राजारामास स्वत: स्वराज्याचा कारभार पाहण्याची विनंती केली. तेव्हा छ. राजारामाने त्यास त्याच पदावर राहण्याची आज्ञा केली, व स्वराज्याचे पुढील काम नेटाने पार पाडण्यास सांगितले. तसेच शंकराजी नारायण यास सचिवपद सांभाळण्यास सांगितले. परशुराम त्र्यंबकास यावेळी छ. राजारामाने रिकामे असलेले प्रतिनिधीपद दिले.[३९]

प्रतिनिधीपदाच्या उत्पत्ती विषयक उपपत्ती :

मराठ्यांच्या राज्यात प्रतिनिधीपद कधी निर्माण झाले यासंबंधी अनेक मते आहेत. त्यांचा पुढीलप्रमाणे आढावा घेता येतो. [१] एका जुन्या बखरीमध्ये या पदाच्या उत्पत्तीचा वृत्तांत पुढीलप्रमाणे दिला आहे.

" ज्यावेळी शिवाजी महाराजांनी कर्नाटकात तंजावर प्रांती स्वारी केली, त्यावेळी तंजावरचे व्यंकोजी राजे यांचा व शिवाजी महाराजांचा वडिलार्जित संपत्तीच्या वाटणीबद्दल थोडासा कलह लागला. रघुनाथ नारायण हणमंते व प्रल्हाद निराजी हे महाराजांच्याजवळ त्या प्रांताचे माहितगार व शहाणे मुत्सद्दी होते. शिवाजी महाराज व व्यंकोजीराजे यांची भेट झाली. त्यावेळी व्यंकोजीराजे ह्यांनी महाराजांशी सौजन्याने वर्तन केले नाही. इतकेच नव्हे तर त्यांचा आपमानही केला. त्यावेळी महाराजांना त्यांचा राग येऊन त्यांनी व्यंकोजीराजाना कैद करावे अशी आज्ञा केली. ही गोष्ट प्रल्हाद निराजी व रघुनाथ नारायण हणमंते ह्यांना कळताच त्यांना फार काळजी

उत्पन्न झाली. शिवाजीराजांनी खरोखरच व्यंकोजीराजास कैद केले तर महाराजांच्या धवल कीर्तीस कलंक लागेल. तेव्हा ही गोष्ट अंमलात येऊ देणे इष्ट नाही, असा त्यांचा विचार ठरला. परंतु महाराजांच्या आज्ञेचा भंग करण्याची त्यांची प्रज्ञा नव्हती. तेव्हा प्रल्हाद निराजी हयांनी एक गुप्त राजकारण केले. ते व्यंकोजी राजाचा वेष घेऊन शिवाजीच्या लोकां-बरोबर मेण्यात बसून त्यांच्या लष्करात आले, आणि सारी रात्र शिवाजीच्या लष्करात व्यंकोजीराजे म्हणून राहिले. दरम्यान रघुनाथ नारायण हणमंते यांनी महाराजांची क्रोधमुद्रा थोडी शांत झाली असे पाहताच व्यंकोजीस कैदेत ठेवणे महाराजांच्या थोरपणास कमीपणाचे आहे अशी महाराजांची खात्री केली. तेव्हा महाराजांनी लागलीच व्यंकोजीराजास आपल्या डे-यात आणण्यास सांगितले व निरोपाची वस्त्रे मागविली. तोपर्यंत व्यंकोजीराजेच आपल्या आज्ञेप्रमाणे कैदेत आहेत अशी कल्पना होती. परंतु वस्तुस्थिती तशी नव्हती. प्रल्हाद निराजी यांनी व्यंकोजीचा वेष घेतला होता. महाराजांचे बोलावणे येताच प्रल्हाद निराजीस समोर जाण्याची मोठी पंचाईत झाली. तथापि ते चतुर व राजकारणात तरबेज झाले होते. शिवाय रघुनाथ नारायण हणमंते हे त्यांना मदत करण्यास जवळच हजर होते. व्यंकोजीचे रूप धारण केलेले प्रल्हाद निराजी जवळ येताच रघुनाथ नारायण यांनी हात जोडून विनंती केली की, महाराज व्यंकोजीराजे सरकारपुढे येण्यास लाचार आहेत त्यांचे प्रतिनिधी आज्ञेप्रमाणे सरकारपुढे हजर आहेत. हे भाषण ऐकून शिवाजी महाराज आश्चर्य चकित झाले व म्हणाले " म्हणजे व्यंकोजी राजे कैद होऊन आले नाहीत की काय ? रघुनाथपंतांनी स्मित करून सांगीतले, " महाराज सरकारांच्या बंधुप्रेमास हा अपकीर्तीचा कलंक लागू नये म्हणून प्रल्हादपंतांनी व्यंकोजीराजांच्या वतीने ही कैद स्वीकारली आहे व त्यांचे प्रतिनिधी म्हणून सरकार चरणांजवळ हजर आहेत." हे ऐकून महाराजांनी त्या मुत्सद्दयाचे गौडबंगाल जाणले व प्रल्हादपंतांकडे मोठया प्रसन्न मुद्रेने अवलोकन करून त्यास सांगितले की, " तुम्ही व्यंकोजी राजेच काय, पण आमचे देखील प्रतिनिधी होण्यास पूर्ण पात्र आहात. आजपासून आम्ही तुम्हास "प्रतिनिधी" हे पद

अर्पण करतो. तुम्ही प्रतिनिधीपद धारण केले म्हणून आमचा नावलौकिक राहिला. धन्य तुमची "[४०]

शिवाजी महाराजांनी प्रल्हाद निराजीस हे पद महाराजांच्या कारकीर्दीच्या अगदी शेवटी शेवटी दिल्याचा उल्लेख काही बखरीमध्ये आढळतो. छ. संभाजीच्या कारकीर्दीत सर्व अष्टप्रधान पदच्युत झाल्यामुळे प्रल्हाद निराजीच्या ह्या प्रतिनिधी पदाचा लगेच अस्त होणे साहजिक आहे.

[२] " श्रीमंत महाराज भोसले यांची बखर " या बखारीत पुढील उल्लेख आहे. " नंतर कैलासवासी संभाजी महाराज छत्रपती यांनी पूर्वी वडिलांचे वेळचा पदमनाथ प्रतिनिधी होता. त्याचे प्रतिनिधीपद दूर करोन नवीन गदाधर पंत वाराणसीकर हे पूर्वी आमचे दिल्लीहून येते समयी वाराणसीस फार उपयोगी पडले सबब त्याजला प्रतिनिधिपद देऊन वस्त्रे अलंकार दिधले. आणि त्यांचे नावाचे शिक्के करून त्यास दिल्हे. त्यांनी कांही दिवस आपले नावे प्रतिनिधिपद चालवून त्यांनी, प्रतापगडचे श्री देवीस गाव नेमून दिल्हे. पुढे काही दिवसांनी गदाधरपंत प्रतिनिधी देव आज्ञा जहाले. संभाजी महाराज कैलासवासी जहाल्यानंतर राजाराम महाराज याणी परशराम त्रिंबक यास प्रतिनिधिपदाची वस्त्रे दिल्ही. "[४१]

[३] "छ. राजाराम-स्वातंत्र्य संग्राम" या लेखात पं. शं. जोशी यांनी प्रतिनिधी पदाच्या निर्मिती संबंधी पुढील माहिती दिली आहे. " राजाराम महाराजांना रायगडी इ.स. १२ फेब्रु. १६८९ रोजी छत्रपतीपद दिले. यापुढील त्यांचे आयुष्य संकटग्रस्त परिस्थितीतील घटनांना खंबीरपणे तोंड देण्यात जाणार असल्यामुळे, त्यांना काही धोका झाला तर स्वराज्याचे मोगलांविरुध्द लढण्याचे काम अडून राहू नये म्हणून राणी येसूबाईनी प्रल्हाद निराजी यांना "प्रतिनिधी" हे अष्टप्रधानांच्या वरचे पद त्यावेळी दिले. प्रतिनिधी म्हणजे " छत्रपतींची प्रतिमा " त्या पदामुळे छत्रपतींच्या अनुपस्थितीत मराठी राज्यांचा गाडा पुढे चालविण्याचा अधिकार प्रल्हाद निराजीस मिळाला. "[४२]

[४] इतिहास संग्रह पुस्तक १ ले अंक ५ यात " प्रतिनिधिपदाची मूळ उत्पत्ती " या मथळयाखाली पुढील मजकूर दिला आहे.

" प्रतिनिधीपद श्रीमंत छ. राजाराम महाराज यांनी प्रल्हाद निराजी ह्यांस चंदीचे मुक्कामी इ. स. १६९२ मध्ये दिले, अशी इतिहासात प्रसिध्दी आहे. प्रल्हाद निराजी हे शिवाजी महाराजांचे न्यायाधीश निराजी रावजी यांचे चिरंजीव असून ते मराठयांच्या तर्फे गोवळकोंडे येथील बादशहाच्या दरबारात वकील होते. ते अत्यंत स्वामिनिष्ठ राजकारण कुशल व बुध्दिमान होते. त्यांनी चंदीचे मुक्कामी राजाराम महाराजांना महाराष्ट्र राज्य रक्षणाचे कामी अप्रतिम साहय केले. म्हणून त्यांनी अष्टप्रधानाहून वरिष्ठ असे प्रतिनिधी हे नवीन पद योजून ते त्यास अर्पण केले. त्यावेळी प्रल्हाद निराजी यांनी आपला अष्टपैलू शिक्का तयार करुन घेतला त्यात पुढील अक्षरे कोरिली होती.

श्री लक्ष्मीनृहरे: प्रीते : । मुद्रा निराजी जन्मन: ।।
राजाराम प्रतिनिधे : । प्रल्हादस्य विराजते ।।

यावरुन प्रल्हाद निराजीस राजारामाचे काळात हे पद मिळाले हे उघड आहे.[४३]

[५] प्रतिनिधी पदाच्या उत्पत्ती संबंधी आणखी एक उपपत्ती अनेकांनी सांगीतली आहे. तीचा वृत्तांत पुढीलप्रमाणे -

" प्रतिनिधीपद शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांचे कारकीर्दीत नव्हते. राजाराम महाराज चंदीस गेल्यानंतर तेथे प्रल्हादपंत शहाणे, कर्ते व सर्व मसलतीचे मूळापासून आधारस्तंभ अष्टप्रधानांतील पदे ज्यांची त्यांनी येऊन स्वीकारल्यामुळे ह्यांस देण्या जोगे पद शिल्लक नाही. तेव्हा ते केवळ आपली प्रतिमाच असे समजून "प्रतिनिधी" असे नवीन पद निर्माण करुन त्यावर प्रल्हादपंताची योजना केली. राजशक १९ अंगिरा नाम संवत्सरे शाके १६१४ [इ. स. १६९२] "प्रतिनिधी" हे पद वास्तविक राजाचेच बरोबरीने

पराक्रमी अशा राजघराण्यातील पुरुषासच द्यावयाचे परंतु तसा पुरुष कोणी नसल्यामुळे हे पद प्रल्हाद पंतास देण्यात आले. या प्रतिनिधिपदाचा अधिकार सर्व प्रधानांवर चालावयाचा असून राजपत्रावर प्रधानाचे उजवे बाजूस प्रतिनिधीची मुद्रा व्हावी असे ठरले." [४४]

"प्रतिनिधी" पदाच्या उत्पत्ती विषयी वरील सर्व मतांचा परामर्श घेतल्यावर हे पद छ. राजारामाच्या कारकीर्दीत इ.स.१६९२ मध्ये निर्माण झाले असून ते जिंजी मुक्कामी राजारामाने प्रल्हाद निराजीस दिले. हे मतच योग्य वाटते. कारण त्याच्या काळापासूनच प्रतिनिधीचा शिक्का व त्याच्याकडून झालेला प्रत्यक्ष पत्रव्यवहार आढळतो. तसेच तेव्हापासून या पदाची वहिवाट ही दिसते. प्रतिनिधीपदाच्या निर्मिती संबंधी अन्य जी मते आहेत ती सर्व बखरीतील असून त्यानी दिलेल्या उत्पत्तींना सबळ पुराव्यांचा आधार नाही.

परशुराम त्र्यंबकाची प्रतिनिधिपदावर नियुक्ती :

छ. राजाराम जिंजीच्या वेढयातून निसटून महाराष्ट्रात आला तेव्हा तिमाजी रघुनाथ हे जिंजीचा वेढा लढवीत होता. तिमाजी पुन्हा बरेच दिवस महाराष्ट्रात आला नाही. तेव्हा तो वेढयात सापडून मारला गेला असावा असे समजून रिकामे असलेले प्रतिनिधी पद छ.राजारामाने परशुराम त्र्यंबकास दिले. परशुरामपंताने स्वराज्यात आठ-नऊ वर्षे केलेल्या कार्याचा खऱ्या अर्थाने गौरव केला. त्याचा शिक्का खालीलप्रमाणे होता -

श्री आईआदिपुरुष प्रसन्न : । श्री राजाराम स्वामी कृपानिधी ।।
तस्य परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी ।। [४५]

छ.राजारामाने जिंजीहून स्वराज्यात येऊन सातारा येथे राजधानी केल्यानंतर इ.स.१६९८ मध्ये परशुराम त्र्यंबकास हे प्रतिनिधीपद दिले. त्या पदाचा शिक्का व वस्त्रे दिली. प्रतिनिधीपदाची वस्त्रे पुढीलप्रमाणे होती.

१ प्रथम भेटीसमयी – चादर बादली.

१ पदाची वस्त्रे – मंदील एक, जामेवार एक, चादर-बादली एक, किनखाब एक, पटका एक.

१ शिक्के, कटार.

१ शस्त्रे – तलवार एक, ढाल एक.

१ जरीपटका.

१ चौघडा.

१ हत्ती – नग तीन

१ घोडा – एक

१ जवाहीर – शिरपेच एक, मोत्याचा तुरा एक, मोत्याचा चौकडा एक, मोत्याची कंठी एक, जिगा एक.

१ चौरी – सोन्याचे दांडीची.

याप्रमाणे वस्त्रालंकार व बहुमान देण्यात आले.[४६] याप्रमाणे राजाराम महाराजांसारख्या कृपानिधींच्या कृपेने परशुराम त्र्यंबक हे प्रतिनिधी बनले.

परशुराम त्र्यंबकास प्रतिनिधीपद छ. राजारामाच्या काळात मिळाले नसून ते ताराबाईच्या काळात मिळाले असे दाखविणारे दोन पुरावे उपलब्ध आहेत. ते पुढीलप्रमाणे –

[१] पंतप्रतिनिधींच्या कैफियतीत पुढील मजकूर आढळतो –

" परशराम त्रिंबक कुलकर्णी मौजे किन्हई यांणी कैलासवासी राजाराम साहेब महाराज याजपाशी नोकरी संपादून लढाया वगैरे करून राज्याचा उपयोग केला. सबब राजाराम महाराज मृत्यू पावल्यावर त्यांची स्त्रि ताराबाई यांणी आपला पुत्र शिवाजी यास तक्ताधिपती केला. नंतर सन १६९९ इसवी म्हणजे शाके १६२१ साली माहे मार्च मध्ये फाल्गुनमासी परशराम त्र्यंबक यास प्रतिनिधीपणाचे पद दिल्हे."[४५]

[२] पंतप्रतिनिधींच्या बखरीतील मजकूर पुढीलप्रमाणे -

" तिमाजी हणमंते मोठे चतुर निघाले म्हणोन त्यास राजारामाने प्रतिनिधी केला होता. परंतु तो तसा जाहला नाही म्हणोन ताराबाईने ते पद परशाराम त्र्यंबक यास दिल्हे. ते राजशाक २८ शाके शालीवान १६२३ वृषनाम संवत्सरे राजा शिवछत्रपति " [४८]

वरील दोन्ही पुराव्यातील तिथी व काळ याचा मेळ बसत नसल्याने ते पुरावे विश्वसनीय वाटत नाहीत. सबब परशुराम त्र्यंबकास प्रतिनिधीपद राजारामाने नव्हे तर ताराबाईने दिले होते हे मत स्विकारता येत नाही.

परशुराम त्र्यंबकास दिलेले प्रतिनिधिपद त्याच्याकडे जास्त दिवस राहिले नाही. कारण पूर्वीचे प्रतिनिधी तिमाजीपंत हणमंते काही महिण्यातच मोगलांच्या वेढयातून मोठया युक्तीने सुटून महाराष्ट्रात आला व छ. राजारामांना भेटला. तेव्हा छ. राजारामास त्याचे साहस व चातुर्य पाहून संतोष झाला. परशुराम त्र्यंबकाकडील प्रतिनिधीपद काढून घेऊन पुन्हा तिमाजीस दिले. आता परशुराम त्र्यंबक रिकामे राहिले म्हणून प्रधान निळो मोरेश्वर पिंगळे हे मृत्यू पावल्यामुळे रिकामे असलेले प्रधानपद छ. राजारामाने परशुराम त्र्यंबकास दिले. परशुराम त्र्यंबकाचा प्रधानपदाचा शिक्का पुढीलप्रमाणे होता.

श्री आईआदिपुरुष प्रसन्न ॥
श्री राजाराम नरपति हर्षनिधान ॥
परशुराम त्र्यंबक मुख्य प्रधान ॥

अशाप्रकारे परशुराम त्र्यंबक यांचे प्रतिनिधिपद जावून तो इ.स. १६९९ मध्ये छ. राजारामाचे प्रधान [पेशवा] झाला. [४९]

छ. राजाराम स्वत: महाराष्ट्रात आल्यामुळे मराठा सरदारांच्यात चैतन्य निर्माण झाले. छ. राजारामाच्या नेतृत्वाखाली मराठयांनी आता चढाईचे धोरण स्वीकारले. महाराष्ट्र व कर्नाटकात सर्वत्र मराठा सरदार पसरलेले होते. बागलाणात - येसाजी व खंडोजी दाभाडे, खानदेशात नेमाजी शिंदे व विश्वासराव पवार व-हाडात परसोजी भोसले, मध्य महाराष्ट्रात

धनाजी जाधव व हणमंतराव निंबाळकर, दक्षिण महाराष्ट्र व कर्नाटकात बहिर्जी हिंदुराव व राणोजी घोरपडे, अशा रीतीने मराठयांच्या हालचाली आक्रमकतेने सुरु झाल्या.[५०] स्वराज्यातील प्रदेश व किल्ले यांच्या रक्षणाची जबाबदारी शंकराजी नारायण व परशुराम त्र्यंबक यांच्यावर होती.

छ. राजारामाच्या हालचाली, मराठा सरदारांचा उत्साह, व मराठयांचे पुन्हा थाटत चाललेले राज्य हे सर्व बघून औरंगजेबास अतिशय खेद वाटला. या संदर्भात खाफीखान म्हणतो - " मराठे बादशाही मुलखावर पसरु लागले त्या दुष्टांचे धाडस आणि उच्छाद ही वाढतच चालला. त्यांच्या धामधुमीच्या बातम्या बादशाहाच्या कानांवर सारख्या येऊ लागल्या. बादशहाने ठरवले या दुष्ट जमातीचे निवासस्थान म्हणजे किल्ले. ते जिंकून घ्यावे आणि या कुटील जमातीची पाळेमुळे खणून काढावी. या कामाच्या मागे लागले पाहिजे "[५१]

मराठयांच्या किल्ल्याविरुध्द बादशाहाची मोहिम :

आपले सेनानी कामात कुचराई करतात त्यामुळे मराठयांची स्थिती सुधारत आहे. असे औरंगजेबास वाटले म्हणून त्याने स्वत:च्या नेतृत्वाखाली स्वराज्य व प्रामुख्याने त्यातील किल्ले जिंकून घेण्यासाठी १९ ऑक्टोबर १६९९ पासून मोठी मोहिम काढली. औरंगजेबाच्या या प्रचंड मोहीमेस शह देण्यासाठी छ. राजारामाने ३१ आक्टोबर १६९९ मध्ये खानदेश व व-हाडच्या प्रदेशात मोठी मोहीम काढली. या मोहीमेवर निघताना राजारामाने स्वराज्यात शंकराजी नारायण व परशुराम त्र्यंबक यांना ठेवले होते. या मोहीमेची माहिती मल्हार रामराव चिटणीस पुढीलप्रमाणे देतो - " येविशी सर्व मुत्सद्दी यांचे विचारे केला. पादशाही शत्रू जवळ म्हणोन हुशारीनेच होते. पन्नास साठ हजार फौज सडी घेऊन निघाले. पुणे मुक्कामी पंचवीस हजार फौज शंकराजी नारायण व परशुराम त्र्यंबक ठेवून आम्हास बलकुबल पडल्यास कुमक

करावी या प्रमाणे बेत राखोन औरंगाबादेस छापा घालावा असे बेताने गेले."[५२]

औरंगजेब बादशहाने १९ आक्टोबर १६९९ रोजी ब्रहमपुरी सोडली. उतारवयातही त्याने स्वत:च्या नेतृत्वाखाली मराठयांचे किल्ले घेऊन त्यांचे मूळ नष्ट करण्याच्या मोहीमेस सुरुवात केली. बादशहाने आजपर्यंत मराठयांचे राज्य जिंकण्यासाठी सर्व मार्गांचा अवलंब केला होता. त्यास अद्याप यश आले नव्हते म्हणून त्याने ही मोहीम सुरू केली.

## कुटील नीतीचा अवलंब :

औरंगजेब हा कुटनीतितज्ञ होता. या मोहिमेस सुरुवात करताच त्याने आपल्या कपटनीतीची चुणूक मराठयांना दाखविली. या काळातील मराठयांच्या प्रमुख अशा दोन मुत्सद्दयांना त्यांच्यात फुट पाडण्यासाठी त्याने दोन पत्रे पाठविली. अशी ती की, रामचंद्रपंत अमात्यास लिहिलेले पत्र परशुराम त्र्यंबकाच्या हाती पडावे व परशुराम त्र्यंबकास लिहिलेले पत्र रामचंद्रपंत अमात्याच्या हाती पडावे.

### रामचंद्रपंत अमात्यास पत्र :

" रामचंद्र [रामचंद्रपंत अमात्य] यांनी जाणावे की दैव अनुकूल झाल्यामुळे तुम्हाला दूरदृष्टी आली, आणि तुम्ही तरनियतखानाला पत्र लिहिले ते आमच्या वाचण्यात आले. पत्रांत तुम्ही मांडलेल्या बहुतेक मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत. तुम्ही आता एकनिष्ठेने सेवा करावी. तुम्ही लिहले आहे त्याप्रमाणे तुम्ही त्वरीत अंमलबजावणी करावी. तुम्ही त्या दुर्दैवी आणि अपयशी माणसाला [राजारामाला] आपल्यामधून हाकलून लावावे. आता त्याचे आयुष्य थोडे बहुत शिल्लक असेल आणि आमच्या विजयी सैन्याच्या भीतीने तो पळ काढू पाहत असेल, तर तुम्ही त्याचे [राजारामाचे] सगळे किल्ले आम्हांला देऊन टाकावे. हे काम तुंम्ही पार पाडले तर तुमच्यावर

बादशाहाची मोठीच कृपा होईल. तुमच्या जमातीमध्ये इतर कुणालाही मिळाला नाही असा दर्जा मानमरातब आणि इतमाम यांचा तुम्हाला लाभ होईल आणि जर का दुर्दैवाने स्वत:चे हित आणि नफा नुकसान समजून घेण्याची तुम्हाला बुध्दि नसली आणि तुमच्या पत्रांतील मजकूर खोटा असला तर लक्षात ठेवा. त्या काफराने [राजारामांने] आमचे पुष्कळ अपराध केले आहेत आणि अतिशय उध्दटपणा दाखविला आहे. तो लवकरच आमच्या गाजींच्या तावडीत सापडेल आणि आपल्या नरकवासी भावाप्रमाणे [संभाजी] वध पावेल. आमच्या शक्तीचा प्रभाव तुम्हालाही दिसून येईल. तुमची मालमत्ता नष्ट होईल. तुंम्ही आपल्या प्रांतास मुकाल. तुमच्या कुटुंबातील लहान थोर अशी सर्व माणसे कैद होऊन वध पावतील." ५३ **( ३१ ऑक्टोबर, १६९९ )**

परशुरामपंत त्र्यंबकास पत्र :

" पन्हाळगडचा किल्लेदार त्र्यंबक [परशुराम त्र्यंबक] यांनी जाणावे की - आमची सैन्ये त्या लबाड राजारामाचे किल्ले जिंकून घेऊन त्याचा नायनाट करण्याच्या उद्देशाने चाल करुन येत आहेत. लवकरच आमची छावणी मुर्तुजाबाद [मिरज] येथे कायम होईल. परमेश्वर कृपेने त्याचे [राजारामाचे] सर्व किल्ले आणि इलाखे आमच्या ताब्यांत येतील. राजारामाला कैद करण्यात येऊन त्याचा भाऊ नरकवासी संभाजी याज प्रमाणे त्याचाहि वध करण्यांत येईल. तुमच्या किल्ल्यातील काही माणसे आम्हाला शरण येऊ पहात आहेत. तुमच्या सुदैवाने सुबुध्दि होऊन तुंम्ही किल्ला आमच्या हवाली करावा. तुम्ही असे केलेतरतर बादशाहाची तुमच्यावर विशेष कृपा होऊन तुम्हाला मोठा मानमरातब देण्यात येईल. तुंम्ही असे केले नाहीत तर परमेश्वर कृपेने किल्ला लवकरच जिंकून घेण्यात येईल. तुमचा काय परिणाम होईल तो दिसून येईल. तुंम्ही आणि तुमची बायका पोरे यांना कैद करण्यात येऊन सर्वांचा वध करण्यात येईल." ५४ **( ३१ ऑक्टोबर, १६९९ )**

बादशाहाने पाठविलेल्या या पत्रांच्यामुळे रामचंद्रपंत अमात्य व परशुराम त्र्यंबक या उभयतांच्या मनामध्ये चलबिचल व थोडाकाळ संशय निर्माण झाला

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

झाला असला तरी त्यांच्यात फाटाफूट अगर दूरावा निर्माण झाला नाही. हे मराठयांच्या इतिहासात नंतर घडलेल्या घटनांवरुन स्पष्ट होते. वरील दोघेही दूरदृष्टीचे असून त्याचा औरंगजेबाची कूटनीती पूर्णपणे परिचीत होती. त्यामुळे थोडया काळातच हे औरंगजेबाचे कुटिल कारस्थान आहे हे त्यांनी ओळखाले असावे.

वसंत गडचा पाडाव :

ब्रहमपुरी सोडल्यानंतर वीस दिवसानी बादशाहा मिरजेस येऊन पोहचला. तेथून तो सरळ पन्हाळयाकडे येईल असा परशुराम त्र्यंबकाचा कयास होता. परंतु औरंगजेब क-हाड जवळ असणा-या वसंत गडाकडे वळला. बादशाहा २१ नोव्हेंबर १६९९ रोजी कराडवरुन येऊन मसूरास पोहोचला.[५५] कृष्णा नदी काठी त्याने आपला तंबू उभारला. यावेळी बादशाहा म्हणाला की, " ही मोहोम काढण्यात माझा हेतू केवळ जिहाद करणे हा आहे. या सेवेने परमेश्वर आणि पैगंबर संतुष्ट होवोत. उद्या मी स्वार होऊन किल्ल्यावर हल्ला करीन आणि काफरवधाचा ध्वज उभा करीन." औरंगजेबाच्या तोफखाण्याचा प्रमुख तरबियतखान याने वसंतगड २५ नोव्हेबर १६९९ मध्ये जिंकून घेतला. बादशाहास आनंद झाला. त्याने या किल्ल्याचे नाव " किलि दे फताह " [यशाची किल्ली] असे ठेवले.[५६]

साता-यास वेढा :

वसंतगड घेतल्यानंतर बादशाहाने आपला मोर्चा सातारा किल्ल्याकडे वळविला. ८ डिसेंबर १६९९ रोजी सातारा किल्ल्यास वेढा दिला.[५७] साताऱच्या वेढया विषयीची सविस्तर माहिती देण्यास औरंगजेबाचा अधिकारी व चरित्रकार साकी मुस्तैदखान या वेढयात हजर होता. त्याने "मासिरे आलामगीरी" या ग्रंथात या वेढयाचे विस्तृत वर्णन केले आहे. तो म्हणतो - " बादशाहाने किल्ल्याच्या पायथ्याशी अर्ध्या कोसाच्या अंतरावर करंजे येथे आपली छावणी कायम केली. किल्ल्याच्या वेढयावर अज्जमशाहा, तरबियतखान, मुनीमखान,

रहुल्लाखान बक्षी इ. सरदारांच्या नेमणूका करुन किल्ल्यास वेढा दिला.

तरबियतखानाने मोर्चे बाँधणी करुन किल्ल्यावर तोफांचा प्रचंड मारा सुरु केला. साकी मुस्तेदखान म्हणतो - " पण किल्ला काय, तेथे तीस गज उंच असा सरळ डोंगरच उभा होता. त्याच्यावर सहागज उंचीने दगडाचे तट बांधले होते. सारांश किल्ल्याचा तट म्हणजे भित नाहीत, तो डोंगरच होता. त्यामुळे तोफांच्या मा-याने त्याच्यावर परिणाम होईना ........ ..... शिवाय दुसरी गोष्ट अशी साता-याचा किल्ला म्हणजे त्या काफरांची राजधानी होती. किल्ल्याच्या बाहेर असलेल्या असंख्य मराठा सैन्याने इसदेच्या ने आणीवर हल्ले केले. वीस कोसाच्या प्रदेशात मराठयांनी गवत-चारा इ. जाळून फस्त केले. काही वेळा तर ते मराठे अतिशय धाडस दाखवून बादशाही छावणी पर्यंत चालू आले. [५८] "

किल्ल्यावर सुभानजी आणि प्रयागजी प्रभू हे मराठयांचे अधिकारी होते. ते निकराने किल्ला लढवत होते. त्यांना बाहेरुन ही मदत मिळत होती. अशाप्रकारे सातारा येथे मोगल मराठा संघर्ष सुरु होता.

परशुराम त्र्यंबक व शंकराजी नारायण हे दोघे स्वराज्याच्या संरक्षणासाठी छ.राजारामाने स्वराज्यात ठेवले होते. दक्षिण महाराष्ट्राची जबाबदारी परशुरामपंतावर होती. त्यामुळे स्वराज्याच्या दक्षिण भागातच सुरु झालेल्या औरंगजेबाच्या मोहीमेवर परशुराम त्र्यंबकाचे बारकाईने लक्ष होते. शिवाय तो यावेळी मराठा राज्याचा मुख्यप्रधान होता. औरंगजेब मिरजेस आला तेव्हा तो पन्हाळयास होता. येथेच त्यास औरंगजेबाने लिहिलेले पत्र मिळाले असावे. औरंगजेबाने मिरजेवरुन जाऊन वसंतगड घेतला व साता-यास वेढा देऊन बसला. या औरंगजेबाच्या वेढयास शह देण्यासाठी परशुराम त्र्यंबक साताराच्या पश्चिमेस सहा मैलावर असलेल्या परळीच्या किल्ल्यावर जाऊन राहिला. परशुराम त्र्यंबक परळीवरुन साताराच्या वेढयास शह देण्याचे काम करीत होता. मोगली फौजेस मिळणारी रसद मारणे, शत्रूवर रात्री अपरात्री छापे घालणे. अजूबाजूचा प्रदेश जाळून खाक करणे, अशा पध्दतीने मोगली फौजेस हैराण करणा-या सर्व मार्गांचा अवलंब त्याच्या नेतृत्वाखाली चालू होता.

शत्रूस हैराण करीत असतानाच आपल्या किल्ल्यावरील शिबंदीचे मनोधैर्य राखण्यासाठी त्यांना दिलासा देणे, रसद पोहोच करणे, त्यांच्याशी बातमी ठेऊन असणे, त्यांना वेळो वेळी योग्य सूचना देणे इ. कामे पंत करीत होता. या संदर्भात मल्हार रामराव चिटणीस लिहितात-

" किल्ल्यावरील लोक हिंमतीचे प्रयागबाबा प्रभू हे सुभेदार त्यांनी बहुत शर्त केली. किल्ला लढू लागला. परळीवर परशुराम त्र्यंबक होते. त्यांनी शाहाजादे आजमशाह यांशी राजकारण राखून किल्ल्यावर मदत व रसद पावती करणे ती व सामान दारुगोळा पावता करावा लोकासही दीलदिलासा देऊन किल्ला लढविले जाईल. ते समयी पादशाही लष्करात धारण बहुत पडली. लष्करात दाणा-चारा मिळेना तेंव्हा हलाकीत आले. बाहेरुन मराठी फौजेची लांडगेतोड रसद चालेना कांही येईना व किल्लाही येईना [५९] "

वरील वर्णनावरुन औरंगजेबाच्या मोहिमेच्या वेळी परशुराम त्र्यंबक घेत असलेल्या मेहनतीची कल्पना येते. या काळातील परशुरामपंताचे एक पत्र उपलब्ध आहे. हे पत्र त्याने मराठा सरदार गणा सावंत यास २७ फेब्रु. १७०० रोजी लिहिले असून त्या पत्रावर तो छ. राजारामाचा मुख्यप्रधान असल्याचा शिक्का आहे. औरंगजेब साता-यास येऊन तीन महिने झाले तरी तिथल्या शिबंदीने त्याला दाद दिली नाही. तेव्हा त्यांच्या कौतुकाचे व गणा सावंत यास त्याच्या शौर्याबद्दल शाबासकी देण्यासाठी लिहिलेले पत्र पुढील प्रमाणे आहे.

" आजी औरंगजेब सातारियाच्या पाई येऊन बसला आहे. त्यास तीन महिने जाहाले. त्याणी उपाय मात्र करुन डोईफोडी केली आहे. परत त्याचा उपाय तुंम्ही चौकीकार गार होऊ दिला नाही. इति मर्दीनसी तडाखा देऊन त्याच हात खर्च केले आहे. तरी शाबास तुमची तुम्ही लौकी निदान कबूल करुन हया गोष्टी केल्या. येणे करुन तुमची किर्ती काही सामान्य जाहाली नाही. राजश्री स्वामीस व आम्हास तुम्ही लौकी बहुत संतोष पावविले आहे. तुमच्या श्रमाचे सार्थक ही श्रीच्या दयेकरुन शीघ्रकालच होईल. कोण्हेनिशी चिंता तुम्हांमध्ये

यतच असा कोणेविसी फिकीर न करणे तुम्हास निदान पडेल तेव्हा तुमच्या जिवास वोपोन देऊन आम्ही आपले जीव वाचऊ हे घडत नाही. यैसी आपला निशा असो देणे." [६०]

परशुराम त्र्यंबकाने आपल्या एका सेनानीस त्याच्या कामगिरीबद्दल शाब्बासकी देण्यासाठी लिहिलेल्या वरील पत्रावरुन मराठयांची मोगला विरुध्दच्या लढयातील जिद्द दिसून येते. तेसेच परशुरामपंता सारखे मराठयाचे अधिकारी हाताखालील सेनानीना कसे प्रोत्साहन देत होते. विश्वास व दिलासा देत होते. शाब्बासकी देऊन त्याच्या श्रमाचे सार्थक लवकरच होईल याचे आश्वासनही देत होते. अशा मराठा मुत्सद्दयांच्या कर्तृत्वामुळेच मराठे मोगला बरोबरच्या दीर्घकाळ चाललेल्या भयंकर संघर्षात टिकून राहिले होते. आता तर ते आक्रमक बनले होते.

तरबियतखान व इतर मोगल सरदार सातारा किल्ला घेण्याची शिकस्त करीत होते. पण त्यात त्याना यश येत नव्हते. मोगलांनी किल्ल्याच्या दगडी तटबंदीत खोदून दोन कोनाडे तयार केले होते. तटात तयार झालेल्या या पोकळीत मोगलांची चौकी ठेवली होती. शेवटी त्यांनी ठरवले की या कोनाडयांत दारु भरुन तटाची भिंत उडवावी व किल्ल्यात घुसण्याचा मार्ग मोकळा करावा. त्याप्रमाणे त्यात दारु भरुन १३ एप्रिल १७०० रोजी पहाटे त्या कोनाडयात तयार केलेल्या सुरुंगाना बत्ती दिली. पण त्या सुरुंगामुळे उडालेले भिंत व तिचे दगड, धोंडे व माती तटातून आत घुसण्याच्या पवित्र्यात असलेल्या हजारो मोगल फौजेवर पडली. त्यामुळे मोगलांचे प्रचंड नुकसान झाले व त्यांच्यात भयंकर हाहा:कार उडाला. त्याचे सविस्तर वर्णन साकी मुस्तैदखानाने आपल्या ग्रंथात केले आहे. [६१]

मोगलांनी उडविलेल्या सुरुंगानी त्यांच्याच फौजेचा भयंकर विनाश झाला. मोगलाचे हजारो सैनिक यात मृत्यु मुखी पडले. साकी मुस्तैदखानाने सुरुंग स्फोटात दोन हजार मोगली फौज मृत्यू पावली म्हटले आहे. तर खाफीखान म्हणतो - " तोफखाण्याचे लोक आणि इतर सरदार शिपाई मृत्युमुखी पडले त्यांची संखया दोन हजार होती. पायदळ शिपाई चाकरीत असलेले मावळे

मराठे इ. दगडाखाली सापडले त्यांची संख्या या पेक्षाही अधिक होती."[62] भीमसेन सक्सेना म्हणतो - " या दुर्घटनेत मराठ्यांची चारशे तर मोगलांची तीन हजार माणसे ठार झाली."[63]

बादशाहास या भयंकर दुर्दशेची बातमी कळली. घोड्यावर स्वार होऊन तो घटनास्थळी येऊन पोहोचला. त्याचे स्वत:च्या डोळ्यांनी ते दृष्य पाहिले. सर्वांची हिंमत खचल्याचे त्यास दिसून आले. बादशाहाने सैनिकांना उत्तेजन देऊन म्हटले - " ज्यांना मृत्यू आला ते शहीद झाले आहेत. धर्मनिष्ठांची हीच कमालीची इच्छा असते. सद्गती प्राप्त होताना हेच उपयोगी पडणारे आहे. तुम्ही सुद्धा जिहाद करण्याकरिता तयार होऊन शरीरात प्राण आहे तोपर्यंत लढले पाहिजे "[64] बादशाहाने लगेच त्याच्या सरदारांना पुन्हा मोर्चे बांधण्याची आज्ञा केली.

सातारा-याचा पाडाव :

साताराच्या वेढयात मोगलांचे प्रचंड नुकसान झाले होते. एक किल्ला घेण्यासाठी त्यांना मोजावी लागलेली ही किंमत तशी जबरदस्त होती. तरी सुध्दा औरंगजेब जिद्दीने व चिकाटीने किल्ला लढवीत होता. मराठ्यांचे छत्रपती राजाराम याचा मार्च १७०० मध्ये मृत्यु होऊन ही मराठे जिद्दीने किल्ला लढवीत होते. परंतु उडालेल्या दोन सुरुंगामुळे किल्ल्याची तटबंदी निकामी झाली होती. या परिस्थितीत आपणास जास्त काळ किल्ला लढविता येणार नाही. अशी किल्ल्यावरील अधिका-याची खात्री झाली होती.

या सर्व बातम्या परळी किल्ल्यावर असलेल्या परशुराम त्र्यंबकास कळत होत्या. त्यामुळे त्याला ही आता किल्ला जास्त काळ लढविणे अवघड आहे असे वाटू लागले. त्याने शाहजादा अज्जम याच्या बरोबर किल्ला देण्यासंबंधीच्या वाटाघाटी सुरु केल्या. या दोघांचे किल्ल्यावर रसद पोहोचविल्यापासूनच राजकारण सुरु होते. यासंबंधी मल्हार रामराव चिटणीस म्हणतो -

" शाहजादे यांनी परशराम पंत याजकडे सांगून पाठविले की - पादशाहाची मर्जी बहुत रूष्ट जाहली. आग्रहास पडले. तुम्ही आग्रह टाकावा. आग्रह न टाकिल्यास बहुत जीवांचा नाश होतो. हा द्रोहो तुमच्या माथां, यास्तव आग्रह सोडून पादशाहाची मर्जी राखावी. सुभेदार यास सांगून पाठवावे तह करून आपल्या लोकांचा बचाव करून किल्ला द्यावा.......
.... तेव्हा परशुरामपंताने विचार केला जे खांसाच आग्रहास पडले प्रयत्न वीरश्रीने करतील तेव्हा नाश करून किल्ला घावा येईल. कारण हल्ल्याने घेतील. हत्ती, उंट, मारून वाट करून खांसा हल्लेस चढणार त्यांवर गोळे टाकणे हे बेहिसाब. आणि शाहजादे यांचाही मनोगत राहीला पाहिजे. पूर्वीपासून कित्येक प्रकारे त्यांचे राजकारण करून सुभे रक्षिले आहेत. पुढे ही कारणे आहेत असा विचार परशरामपंती करून सुभेदार यास सांगून पाठवून दिले की, सर्व लोकांचा बचाव करून चीज, बस्त, हत्यार सुध्दा घेऊन उतरावे. असे शाहजादे याचे विद्यमाने करून त्यांचे लष्करात उतरले. त्यांचा निरोप घेऊन लोक सर्व परळीस निघोन गेले. पादशाहाचे निशाण, लोक चढले किल्ला फत्ते केला. याप्रमाणे सातारा घेतला[६५] "

सातारचा किल्ला परशुराम त्र्यंबकाचे अज्जमशाहा बरोबर वाटाघाटी करून दिला. या संबंधाने इतिहास संशोधक द.ब. पारसनीस पुढील वृत्तांत देतात -

" औरंगजेबास वाटले अशाने किल्ला घेणे अवघड म्हणून त्याने त्यांचे नेहमीचे फितुरीचे तंत्र अवलंबीले. किल्ल्याचा हवालदार सुभानजी लावघरे यास सगळया परळी खो-याची देशमुखी देण्याचे कबूल केले. सुभानजी बरोबर फितुरीच्या वाटाघाटी सुरू झाल्या. त्यातील एक पत्र प्रयागजीच्या हाती पडले. ती हकीकत प्रयोगजी प्रभू याने परळीस परशुराम त्र्यंबक यास कळविली. हवालदारास एकदम कैद करणे ही प्रयोगजीस योग्य वाटेना. परशुरामपंताने विचार केला असा फितुरीने किल्ला शत्रू हाती गेल्यास किल्ल्यावरील सर्व लोकांचा घात होईल. म्हणून परशुरामपंताने शाहजादा अज्जमशाहा याच्या मार्फत तहाचे बोलणे लावले. औरंगजेबाने मान्य केले. किल्ल्यावरील लोकानी हत्यारासह निघून जावे

त्यांना मोगलांनी हरकत करू नये. सुभानजीस परळीची देशमुखी बादशाहा देईल. मराठयांनी ते वतन त्यास उपभोग द्यावे. ठरल्याप्रमाणे मराठयांनी किल्ला सोडून दिला "[६६]

सुभानजी लावघरे हा मोगलांस फितुर झाला होता याला पुष्टी देणारे आणखी दोन पुरावे खाफीखान व साकी मुस्तैदखान यांच्या ग्रंथात मिळतात.

खाफीखान म्हणतो – " सुभानजीला पांच हजारी आणि दोन हजारी स्वारांची मन्सब देण्यात आली. हत्ती, घोडे, जडावाना खंजीर, ध्वज आणि नगाऱ्याचा मान हे त्यास देण्यात येऊन शिवाय वीस हजार रुपये नगद त्याला देण्यात आले "[६७]

साकी मुस्तैदखान म्हणतो – " सुभानला बादशाहाच्या चाकरीत घेण्यात आले. त्याला पांच हजारी आणि दोन हजार स्वारांची मनसब देण्यात आली. खिलतीचा पोशाख, कटयार, घोडा, हत्ती, ध्वज, नगारे, नौबतीचा मान ही त्यास देण्यात आला. या शिवाय त्याला वीस हजार रुपये बक्षीस म्हणून देण्यात आले "[६८]

वरील तिन्ही पुराव्याचा विचार केल्यास सुभानजी हा फितुर झाला असावा हे मान्य करण्यात अडचण दिसत नाही. बादशाहाने त्याला परळीची देशमुखी देऊन शिवाय आणखी जो त्याचा मानमरातब केला त्यावरून स्पष्ट होते. सुभानजीच्या या आदर सत्कारात बादशाहाचा धुर्त हेतू दिसतो. तो म्हणजे बादशाहास फितुर होणाराचा खूप फायदा होतो. त्यास मानमरातब मिळतो. हे मराठयाकडील अधिकाऱ्यांना कळावे व त्यानी किंवा त्यांच्यातील कच्च्या दुव्यांनी फितुरांचे [सुभानजीचे] अनुकरण करावे.

२१ एप्रिल १७०० रोजी सातारा किल्ला मोगलांच्या हाती पडला. शाहाजादा आज्जमच्या मध्यस्तीने किल्ला हाती आला म्हणून त्याचे नाव " अजमतारा " असे ठेवण्यात आले. सातारा किल्ल्याचा पाडाव अटळ असल्याचे दिसून आल्यावर परशुराम पंताने चतुराईने मोगलांशी तडजोडीने बोलणे सुरू करून किल्ल्यावरील मराठा शिबंदीचा विनाश टाळला. मोगला विरुध्दाच्या

संघर्षात मराठ्यांचे मनोधैर्य राखण्यासाठी हा निर्णय उपयुक्त ठरला असेल.

छ.राजारामाचा मृत्यू :

बादशहाने सुरु केलेल्या मोहिमेस शह देण्यासाठी छ.राजारामाने खानदेश व-हाडची मोहिम काढली होती. मोगली प्रदेशात धामधूम उडवून देवून बादशहाच्या ब्रह्मपुरी येथील छावणीस शह देऊन छ.राजाराम परत फिरला. बरोबरचे सरदार साता-याच्या बचावासाठी धावले. छ.राजाराम विश्रांतीसाठी सिंहगडावर गेला. मोहीमेच्या दगदगीचा त्याच्या नाजूक प्रकृतीवर ताण पडला होता. अंगात ज्वर भरुन प्रकृती ढासळली व अल्प आजाराने २ मार्च १७०० रोजी छ.राजारामाचा मृत्यू झाला.

बादशाही छावणीत छ.राजारामाच्या मृत्युची बातमी कळली तेंव्हा बादशहा व त्याचे अधिकारी यांना जो आनंद झाला तो खाफीखानाच्या शब्दात पहा -

" बादशहाला ही बातमी कळली. परमेश्वराच्या लेकरांना त्या काफराकडून [राजारामा] पीडा होत होती. ती आता दूर झाली. म्हणून त्याने परमेश्वराचे आभार मानले, आणि शहादणें वाजविण्याची आज्ञा केली. ही आतमी मोगले लष्करात पसरली. बादशहाचे हितचिंतक आणि एकनिष्ठ सेवक यांनी बादशहाचे अभिनंदन केले. परस्परांस ते मुबारक देऊ लागले. त्यांची दृष्टी वरवरची होती. परमेश्वराच्या दरबारात काय संकल्प आहे याची त्यांना काय कल्पना ? संभाजी कैद होऊन वध पावला त्या वेळी त्यांना राजारामाच्या अस्तित्वाचे महत्त्व वाटले नाही. त्या वेळी ते म्हणत की बरे झाले दक्षिणेतून युध्दाचे मूळ [संभाजी] नाहीसे झाले. आताही ते असेच म्हणून आपल्या मनाचे समाधान करुन घेऊ लागले. ते एकमताने म्हणू लागले. या दुष्ट मराठ्यांची पाळेमुळे नाहीशी झाली त्याच्या [राजारामाच्या] मागे त्याची लहान मुले आणि निराधार बायका राहिल्या आहेत. त्यांचा निकाल लावणे म्हणजे अगदी सोपे आणि क्षुल्लक आहे. "[६९]

7565
A

छ. राजारामाचा झालेला मृत्यू म्हणजे मराठयांच्यावर झालेला जबरदस्त आघात होता. या आघातून मराठी राज्यास सावरण्याचे व धीर देण्याचे काम महाराणी ताराबाई व रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण, परशुराम त्र्यंबक, धनाजी जाधव इ. नी केले.

परशुराम त्र्यंबकाची तथाकथीत शरणागती :

छ. राजारामाच्या मृत्यूनंतर सातारा किल्ल्यावरील मराठा शिबंदीस विनाशापासून वाचवण्यासाठी परशुराम त्र्यंबक यांने मोगलांशी बोलणी सुरू केली. तथापि या त्याच्या हालचाली म्हणजे परशुराम पंताची शरणागतीच होती असे म्हणणारे काही इतिहासकार आहेत. त्यांच्या मताचा येथे आढावा घेणे उचित ठरते.

खाफीखान म्हणतो : - " परळीच्या किल्ल्यावर परशुराम नावाचा कारभारी होता. साता-याहून परळी किल्ला सात कोसावर आहे. त्या प्रांताची व्यवस्था नालायक आणि ज्याचा शेवट वाईट झाला अशा रामराजातर्फे [राजारामा] परशुरामाकडे होती. राजारामाच्या मृत्यूची बातमी कळताच त्याचा धीर खचला. त्याने किल्लेदाराशी सल्लामसलत न करताच किल्ल्यातून बाहेर पडून मोगलांची गाठ घेतली."[७०]

साकी मुस्तैदखान म्हणतो :- " त्या काफराच्या दौलतीचा [मराठयांचा] कारभारी परशुराम याने पाहिले की - बादशाहावर परमेश्वराची कृपा आहे. बादशाहाच्या तेजाचा त्याच्यावर प्रभाव पडला. आपला सर्वनाश होईल असे त्याला वाटू लागले. परळीचा किल्ला साता-यापासून सात कोसांवर आहे. तेथे परशुराम राहत होता. तेथून निघून तो साता-याला आला. सहुल्लाखान बक्षी याच्या मध्यस्तीने तो बादशाहाला शरण गेला. बादशाहाने त्याच्यावर कृपा केली."[७१]

सर जदुनाथ सरकार म्हणतात :- " राजाराम महाराजाच्या मृत्यूनंतर लगेच परशुरामपंताने मोगलांना मिळण्याची तयारी दाखविली. तथापि बादशहाचे

त्याच्यावर विश्वास ठेवला नाही. ताराबाईंना हे समजताच परशुरामपंतास प्रतिनिधीपद देऊन त्यांनी त्यास आपलासा केले."[७२]

जदुनाथ सरकारांनी परशुरामपंताने मोगलांस मिळण्याची तयारी दर्शविली होती. हे जे मत मांडले आहे ते खाफीखान व साकी मुस्तैदखान यांच्या मताच्या आधारे मांडले असावे. पण वरील दोन्ही मोगली इतिहासकारांच्या म्हणण्यात अतिशयोक्तीचा भाग आहे हे आपणास पुढे घडलेल्या घटनांच्या आधारे स्पष्ट झालेले दिसते.

या दोन्ही मतांचा विचार करताना एक बाब लक्षात ठेवली पाहिजे की - त्यांच्याच म्हणण्याप्रमाणे परशुराम त्र्यंबक हा त्या प्रांताचा प्रमुख कारभारी होता. सातारा परिसरात चाललेली मोगलाबरोबरची झुंज त्याच्याच नेतृत्वाखाली चालली होती. तेथील किल्लेदार मोगलाच्या बरोबर स्वतंत्रपणे वाटाघाटी करू शकत नव्हते. कारण तो अधिकार त्यांना नव्हता. त्यामुळे साताराचा किल्ला मोगलांच्या स्वाधीन करण्या संबंधीच्या सर्व वाटाघाटी परशुरामपंताने केल्या. त्या का केल्या ? कोणत्या परिस्थितीत केल्या ? याचे सविस्तर विवेचन आपण पाहिले आहे. मोगलांनी केलेल्या सुरंगाच्या स्फोटामुळे तरबियतखानच्या मोर्चाच्या बाजूची भिंत बुरूजाच्या मध्यापर्यंत सत्तर गज लांब अशी कोसळली होती. सुभानजीच्या फितुरीचा धोका होता. या परिस्थितीत तडजोड करणे हाच शहाणपणाचा एकमेव मार्ग होता. त्याचा अवलंब परशुरामपंताने अज्जमशाहा मार्फत राजकारण करून वाटाघाटी द्वारे केला. याचा अर्थ तो शरणागती पत्करत होता किंवा मोगलांना सामील होण्यास उत्सुक होता असा होऊ शकत नाही. त्याने तात्पुरती केलेली ती तडजोड होती.

दुसरे असे की, जर सामीलच व्हायचे होते तर तसा जोरदार प्रयत्न औरंगजेबाने यापूर्वीच केला होता. तेव्हाच तो सामील होऊ शकला असता.

सर जदुनाथ सरकारांनी म्हटले आहे की - ताराबाईंना हे समजताच त्यांनी परशुरामपंतास प्रतिनिधीपद देऊन आपलासा केले. या त्यांच्या म्हणण्यातही तथ्य वाटत नाही. येथे एक लक्षात ठेवले पाहिजे की - परशुराम

हा ताराबाईच्या खास विश्वासातला होता तसेच त्यांच्याकडे स्वराज्याचे मुख्यप्रधानपद होतेच. त्यामुळे पुन्हा दुस-या पदाची लालूच दाखवून त्यास आपलासा करण्याचे कांहीही कारण नव्हते. या सर्वा पेक्षा पुढील घटनाच इतक्या स्पष्ट आहेत की, त्यावरून वरील तिन्ही मतांचा फोलपणा स्पष्ट होतो.

मोगल परळीचा किल्ला घेतात :

सातारचा किल्ला घेतल्या नंतर साता-याच्या पश्चिमेस सहा मैलांवर असलेला परळी किल्ला घेण्यासाठी औरंगजेबाने लगेच फत्तेउल्लाखान यास रवाना केले. त्या किल्ल्यावर परशुराम त्र्यंबक हा स्वत: हजर होता. फत्तेउल्लाखानाने मोर्चे बांधणीचे काम सुरु केले. औरंगजेब स्वत: ३० एप्रिल १७०० रोजी परळीस पोहोचला. परळीच्या समोरच्या मैदानात त्याने आपली छावणी टाकली. मोगलांनी परळी घेण्याचे शिकस्त चालविली. या वर्षी पावसाळा लवकर सुरु झाला. हा प्रदेश अगोदरच मराठयांनी बेचिराख केला होता. रसद तोडण्या मराठयांचे हल्ले चालूच होते. त्यामुळे मोगली फौजेचे जे हाल झाले त्याची साकी मुस्तैदखान, खाफीखान व मल्हार रामराव चिटणीस यांणी बहारीची वर्णने केली आहेत.

साकी मुस्तैदखानाने लिहिले आहे :-

" पाऊस धो-धो पडत होता. लष्करात धान्याची व चा-याची कमालीची टंचाई होती. त्या भयंकर परिस्थितीबद्दल मी काय आणि असे लिहू ? परिस्थितीच्या चित्रणाची नुसती कल्पना केली तरी माझ्या प्रतिभेचा झरा एकदम आटून जातो. काळे मेघ रात्रंदिवस वर्षत होते. अनाथांच्या नेत्रातून अश्रूंची अखंड धार लागावी तसा रात्रंदिवस पाऊस पडत होता..... ... नद्यांना पूर आले होते, आणि रसद कोणीकडूनही येईना. यामुळे भयंकर दुष्काळ पडला. सुबत्ता व आराम यांची कल्पनाही करवेना "[७३]

<u>खाफीखान आपल्या नेहमीच्या शैलीत वर्णन करतो :-</u>

" पाऊस रात्रंदिवस पडत होता. मराठे मुंग्या आणि टोळा याप्रमाणे बादशाही सैन्याभोवती घिरट्या घालीत. त्यांनी भोवतालचा प्रदेश उध्वस्त करुन टाकला होता. त्यामुळे रसद आणि गवत लष्करात येणे बंद झाले. बादशाही फौजेची स्थिती अत्यंत कठीण झाली. खाण्या-पिण्याचे जिन्नस मिळेनासे झाले. माणसे आणि जनावरे कमालीची हैराण झाली. ती इतकी की कुणालाच हालचाल करण्याची शक्ती राहीली नाही. एकीकडे महर्गता तर दुसरीकडे पैशाची टंचाई. कोणी एका दमडीला अमृत विकतो म्हटले तरी कोणी विकत घेण्यास तयार झाले नसते." ७४

<u>मल्हार रामराव चिटणीस याच संदर्भात म्हणतो :-</u>

" पर्जन्यकाळाचे दिवस प्राप्त होऊन अतिवृष्टी होती जाली.... ........ पावसानेही लष्कर बहुत सडूं लागले. पातशाहा मनात खजील होऊन अशा कामास आपण बसोन खराब व्हाले यात फायदा नाही. मराठे लोक हरामजादे, रानचे हयवान कजाखि करितात असे चित्ता दिलगीर होऊन बसले. तीन चार दिवस पाऊसामुळे सखाण नाही. लोक उपोषित राहिले. शाहू महाराजा बराबर होते. ज्योत्यानी केसरकर याणे तेलात काकडे भिजवून त्याजवर भात करवून महाराजांस घातला........ पाऊसाबद्दल हत्ती, घोडे, उंटे बहुत मेली." ७५

वरील तिन्ही वर्णनावरुन परळी परिसरातील पावसाळा व मराठ्यांचे युध्दतंत्र यामुळे बादशाही फौजेचे कशी त्रेधा तिरपीट उडाली असेल हे लक्षात येते. अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही औरंगजेब व वेढाचा प्रमुख सेनानी फत्तेउल्लाखान यानी नेटाने वेढ्याचे काम चालूच ठेवले होते. ४ जून १७०० रोजी फत्तेउल्लाखानाने मोर्चासाठी महत्त्वाच्या असलेल्या एका खडकाचा ताबा घेण्या-साठी निकराचा हल्ला केला. मराठ्यांनी ही बाहेर पडून त्यांच्यावर हल्ला केला. खडकापासून किल्ल्याच्या लहान दरवाजापर्यंत मोकळी जागा होती त्यात

निकराची झुंज झाली. मराठे माघार घेऊन किल्ल्यात घुसले. त्यांनी तटावरुन बंदुकीचा मारा सुरु केला. किल्ल्याला जाण्याच्या वाटेवर मराठ्यांनी जमिनीखाली दारु भरुन ठेवली होती. त्यास त्यांनी आग लाऊन दिली. त्यात फत्तेउल्लाखानाचा नातू फकिरुल्लाखान आणि इतर सत्तर माणसे मारली गेली व अनेक जखमी झाली.[७६] मोगलांना खडकाचा ताबा सोडून धावा लागला. मराठ्यांनी त्यांचा हल्ला परतावून लावला. या संबंधीचे मराठी कागदपत्रात पुढीलप्रमाणे उल्लेख आढळतात -

[१] शाहू छत्रपती कृष्णाजी बल्लाळ, देशाधिकारी प्रांत सातारा यास लिहिलेल्या पत्रात म्हणतात - " भिकाजी जाधव याणे स्वामींच्या राज्यात बहुत एकनिष्ठेने सेवा केली. पूर्वी किल्ले सज्जनगडास तांब्राने वेढा घातला ते समयी व तांब्राकडील लोकांनी सुलतानढवा केला ते समयी नफर मजकूराने बहुत कष्ठ मेहनत केली. सुलतानढवा मारुन काढिला तेव्हा जातीने शर्थ केली. "[७७]

[२] परशुराम त्र्यंबक कृष्णाजी महादेव गोडबोले यास लिहिलेल्या पत्रात म्हणतो - " कृष्णाजी महादेव गोडबोले याणे किल्ले सातारीयाचे मुक्कामी हुजुर येऊन विनंति केली जे ...... पादशाहा किल्ले सातारीयास व किल्ले सज्जनगडास येऊन परोध देऊन बैसले. किल्ले सज्जनगडास दंगा करुन घ्यावयास लोक चढविले होते. ते समयी आपला भाऊ गोविंद महादेव याणे गडावरी राहून, लोक तांब्राकडील दंगा करुन चढले होते. त्यास मारुन काढून खाले घातले. स्वामींची फत्ते केली. "[७८]

[३] ताराबाईचे राजश्री यादवराऊ सिउदेऊ देशाधिकारी सुभा प्रांत अजरे यास पत्र - " मत्याजी इंगवले ....... याणी स्वामींच्या सेवेसी विनंती केली की, आपले बाप सिदोजी इंगवले ......... स्वामी कार्यावर किले सजनगडी पडला. "[७९]

वरील सर्व पत्रावरून मराठयानी मोगलाचा ४ जून १७०० रोजी झालेला हल्ला निकराने परतवून लावल्याचे दिसते. प्रयत्नाची पराकाष्ठा करून ही किल्ला हाताशी येत नाही व पावसाळाही सुरु झालेला आहे हे पाहून शहजादा आज्जमशाहाने परशुरामपंता बरोबर वाटाघाटी सुरु केल्या. आज्जमशाहाचे मध्यस्थिचे तह होऊन ९ जून १७०० रोजी परशुरामपंताने परळीचा किल्ला बादशाहाच्या ताब्यात दिला. यासंबंधी म.रा.चिटणीस म्हणतो -

" पादशाहा बहुत जिकीरीस आले. तेव्हा शाहजादे यांनी निरोप परशारामपंतास पाठविला. त्यावरून तह करून हत्यारे वगैरे सुध्दा जावे असे ठरवून श्री रामदास स्वामीचे समाधीचे दार चिणोन श्री रामाच्या मूर्ती घेऊन, देवळात दगडाच्या बसवून सर्व पश्चिमेच्या मु-यांतून चढून किल्ले वासोटे येथे गेले "[८०]

परळीचा किल्ला ताब्यात येताच बादशाहाने नवीन देवळे पाडून टाकली. जुन्या मशिदी दुरुस्त केल्या. किल्ल्याचे नाव "नवरसतारा" असे ठेवण्यात आले.[८१] परळी घेतल्या नंतर औरंगजेब आपल्या लवाजम्यासह भूषणगडाकडे निघून गेला.

वरील चर्चेवरून परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी सामान्य कुटुंबात जन्मलेला असून सुध्दा स्वकर्तृत्वावर मराठयांच्या राजकारणात महद्पदास पोहचल्याचे स्पष्ट होते. छ.शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीच्या अखेरीस तो स्वराज्याच्या सेवेत दाखल झाला. स्वराज्यातील थोर मुत्सद्दी सरदार रामचंद्रपंत अमात्य याच्या पदरी त्याने मुलुखगिरी, मुत्सद्देगिरी, राज्यकारभार इ. क्षेत्रातील धडे घेतले. मराठयांच्या स्वातंत्र्य युध्दाच्या काळात मोगली आक्रमणाशी मुकाबला करून स्वराज्याचे संरक्षण करताना परशुरामपंताने स्वत:ची योग्यता सिध्द केली. त्याची योग्यता व कर्तृत्व याने प्रभावीत होऊन छ.राजाराम महाराजांनी त्याला त्यांच्या कारकीर्दीच्या अखेरीस "पेशवा" व "प्रतिनिधी" ही अत्यंत महत्वाची पदे बहाल केली. तेथून पुढे परशुराम त्र्यंबकाची मराठयांच्या महत्वाच्या मुत्सद्दयात सरदारात गणना होऊ लागली होती. मराठयांच्या स्वातंत्र्य युध्दातील छ.राजारामाच्या काळातील त्यांची कामगिरी उल्लेखनीय अशीच आहे.

--------o--------

## प्रकरण १ ले

## - संदर्भ -


१. पगडी . सेतु. माधवराव - हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ.३.

२. मेहेंदळे वा. प. - परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी यांचे चरित्र, पृ.१४.

३. भारत वर्ष-वर्ष १, अंक १,- पंतप्रतिनिधींची बखार, पृ.३१.

४. पारसनीस द.ब., - परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी, पृ.५.

भागवत अ.ग. - सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास ग्रंथ क्र.१, पृ.९६.

मेहेंदळे वा.प. - " उपरोक्त " पृ.२९.

५. पंतप्रतिनिधींची बखार - पृ.३१-३२.

- पारसनीस द.ब. "उपरोक्त" पृ.३-४, "साखरगड निवासिनी" संबंधी जी आख्यायिका आहे ती त्र्यंबकपंताच्या संदर्भातच घडली आहे. त्र्यंबक पंताचे वडील म्हणजे परशुरामपंताचे आजोबा यांच्या संदर्भात घडलेली नाही असे श्री भागवत अ.ना. यांनी त्यांच्या " सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास" ग्रंथ क्र.१ मध्ये पृ.९८-९९ वर म्हटले आहे.

६. पारसनीस द.ब. "उपरोक्त" पृ.४.

७. कित्ता - पृ.६.

८. कित्ता - पृ.७, मेहेंदळे वा.प. "उपरोक्त" पृ.३१.

९. पंतप्रतिनिधींची बखार, पृ.३२.
- भागवत अ.ना. "उपरोक्त" पृ.१००
- सरदेसाई गो.स. - स्थिरबुध्दिराजाराम, पृ.३६.

१०. भागवत अ.ना. "उपरोक्त" पृ.१०१, १०२;
सरदेसाई गो.स. "उपरोक्त" पृ.३७.

११. राजवाडे वि.का. - मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड १५ वा. ले.३४८,
- पगडी से.मा. "उपरोक्त" पृ.९५,
- -"- -"- इतिहासाचा मागोवा, पृ.३२.
- कुलकर्णी जी.टी. -
- Kulkurni G.T. The Mughal-Maratha Relations : Twenty Five fateful years (1682-1707) P.270.

१२. सरदेसाई गो.स., "उपरोक्त" पृ.३२

१३. पगडी से.मा., इतिहासाचा मागोवा, - पृ.३४.

१४. पारसनीस द.ब., "उपरोक्त" पृ.९.

१५. आपटे द.वि. दिवेकर स.मा., - शिवचरित्र प्रदीप - पृ.३६;
- पंत प्रतिनिधीची बखार, पृ.३६;
- पवार ज.भा., सेनापती संताजी घोरपडे, पृ.४७.

१६. पगडी से.मा., मराठयांचे स्वातंत्र्ययुद्ध, पृ.२४.

१७. कित्ता - पृ.२५.

१८. Pawar J.B. Chh. Rajaram and His State (Unpublished Ph.D thesis) P.121.

१९. पगडी से.मा., इतिहासाचा मागोवा, पृ.४६.

२०. भागवत अ.ना., "उपरोक्त" पृ.१०७, पं.प्र.बखार पृ.३८.
मेहेंदळे वा.प., "उपरोक्त" पृ.३४.

२१. पगडी से.मा. - मोगला मराठा संघर्ष - पृ.१२६-१२७.

२२. भागवत अ.ना., "उपरोक्त" पृ.१०९-११०, पं.प्र.बखार पृ.३८.

२३. पगडी से.मा., मोगल मराठा संघर्ष, पृ.१११-११२.

२४. आपटे द.वी., व ओतूरकर रा.वि., - महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास पृ.५६
पवार ज.भा., महाराणी ताराबाई, पृ.३१.

२५. पगडी से.मा., - मोगल मराठा संघर्ष, पृ.१२३.

२६. पारसनीस द.न., "उपरोक्त" पृ.१०, मेहेंदळे वा.प. "उपरोक्त" पृ.३५.

२७. कित्ता पृ.११, कित्ता- पृ.३५.

२८. कित्ता पृ.१२, कित्ता पृ.३७.

२९. सरदेसाई गो.स., "उपरोक्त" पृ.५९.
- कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह. - मराठयांचा इतिहास खंड १ ला, पृ.४२२

३०. सरदेसाई गो.स., "उपरोक्त" पृ.६०-६१.

३१. कित्ता., पृ.९६.

३२. पवार ज.भा., सेनापती संताजी घोरपडे, पृ.७२.

३३. पं.प्र. बखर, पृ.३२-३३.

३४. कित्ता - पृ.३५.

३५. कुलकर्णी अ.रा, खरे ग.ह., "उपरोक्त" - पृ.४२९.

३६. पगडी से.मा, "इतिहासाचा मागोवा" पृ.४०.

३७. पारसनीस द.ब., "उपरोक्त" पृ.१३.

३८. सरदेसाई गो.स., "उपरोक्त" पृ.८८.

३९. कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह., "उपरोक्त" पृ.४३३.

३९. पारसनीस द.ब., "उपरोक्त" पृ.१३, भागवत अ.ना. "उपरोक्त" पृ.१३१
- भिडे व्ही.जी, - सातारचे श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचे वंशाचा व प्रतिनिधी आणि अष्ठ प्रधानाचा इतिहास.
पृ.१२१.
-मेहेंदळे बा.प., "उपरोक्त" पृ.४०.

४०. पारसनीस द.ब., इतिहास संग्रह, पुस्तक १ ले अंक ५ वा - पृ.९-१०.

४१. भावे वि.ल., मराठी दफ्तर रुमाल १ ला - पृ.१०९.

४२. कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह., "उपरोक्त" पृ.४१३-४१४.

४३. पारसनीस द.ब., इतिहास संग्रह पु.१ ले. अंक ५ वा, - पृ.९.

४४. चिटणीस म.रा., थोरले राजाराम महाराज यांचे चरित्र - पृ.१६-१७.
- सरदेसाई गो.स., "उपरोक्त" पृ.४१-४२, भागवत अ.ना. "उपरोक्त" पृ.१३१.
- भिडे व्ही.जी., "उपरोक्त" पृ.१२०, गर्गे स.मा. "करवीर रियासत" पृ.२९.

४५. भिडे व्ही.जी., "उपरोक्त" पृ.१२२.
- भागवत अ.ना., "उपरोक्त" पृ.१३४.

४६. भिडे व्ही.जी., "उपरोक्त" पृ.१२२-१२३.
- पारसनीस द.ब., "उपरोक्त" पृ.१३.

४७. वाड जी.सी., - कैफियतस्, यादीज अँड कॉटिरिंग, - पृ.१४५.

४८. पं. प्र. बखार, - पृ.४०.

४९. कित्ता - पृ.४०, पारसनीस द.ब. "उपरोक्त" पृ.१४,
- राजवाडे वि.का, "मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड १५." पृ. २११ व २१५.
- भागवत अ.बा. "उपरोक्त" पृ.१३८, भा.इ.सं.मं.पुणे, तृतीय संमेलन - पृ.७६.

५०. पगडी से.मा., हि.स्व. आणि मोगल, - पृ.१८४.

५१. --"-- , म. स्वा.युध्द, - पृ.४१.

५२. चिटणीस म.रा., भो.रा.म. चरित्र, - पृ.४७.

५३. पगडी से.मा., मो.म. संघर्ष - पृ.७१-७२.
Sarkar Jadunath - House of Shivaji - P. 271-272.

५४. कित्ता - पृ.७२, कित्ता पृ.२७१.

५५. पगडी से.मा, म.स्वा. युध्द - पृ.४३.

५६. --"-- मराठे व औ. - पृ.७४.

५७. कित्ता - पृ.७५.

५८. कित्ता - पृ.७८,
- पगडी से.मा. मोगल आणि मराठे - पृ.१४४.

५९. चिटणीस म.रा, "उपरोक्त" पृ.२८.

६०. पवार आप्पासाहेब, ताराबाई कालीन कागदपत्रे खंड १ ला - पृ.११८-११९.

६१. पगडी से.मा. - म. व औ. - पृ.८३-८४.

६२ --"-- - म. स्वा. युध्द - पृ.४६.

६३ --"-- - मो. आणि म. - पृ.१४८.

६४. --"-- - म. स्वा. युध्द - पृ.४६.

६५. चिटणीस म.रा, "उपरोक्त" पृ.३०-३१.

६६. पारसनीस द.ब., इतिहास संग्रह, पुस्तक १ ले. अंक.४ था - पृ.३.

६७. पगडी से.मा, म. स्वा. युध्द - पृ.५०.

६८. --"-- म. व औ. पृ.८७.

६९. --"-- म. स्वा. युध्द - पृ.४८-४९.

७०. कित्ता - पृ.४९.

७१. पगडी से.मा., म. व औ., - पृ.८६-८७.

७२. पवार ज.भा., म.ताराबाई पृ.१२९.

७३. पगडी से.मा., म. व औ. - पृ.९०.

७४. --"-- म. स्वा. युध्द - पृ.५०.

७५. चिटणीस म.रा. "उपरोक्त" पृ.३१

७६. पगडी से.मा., - मराठे व औरंगजेब, - पृ.९१.

७७. मावजी पी.व्ही., पारसनीस डी.बी., सनदा व पत्रे - पृ.२००-२०१.

७८. कित्ता - पृ.२०१.

७९. गुजर म.वी. - करवीर छ.घराण्याच्या इतिहासाची साधने भाग-१ पृ.१.;

- पवार आप्पासाहेब - "उपरोक्त" पृ.१२९.

८०. चिटणीस म.रा, "उपरोक्त" पृ.३१.

८१. पगडी से.मा., म. व औ. - पृ.९२.

--------x-------